दैनिक साहसिक
epaper www.sahsik.com
सजग समाजाचा दक्ष प्रहरी
वर्धा, नागपूर, अमरावती, अकोला, बुलडाणा,गडचिरोली, धुळे, जळगाव, औरंगाबाद, नाशिक, पुणे, रत्नागिरी, मुंबई व दिल्ली येथुन एकाचवेळी वितरित ...!
वर्ष : १६ | अंक :११५ शनिवार ०५ नोव्हेंबर २०२२ | मुख्य संपादक : रविंद्र एन. कोटंबकार | (पृष्ठ -८) | मूल्य : ३ रुपये

# मुंबई कोर्टाकडून महापालिका आयुक्त इकबाल चहल, सुरेश काकाणी व पूर्व मुख्य सचिव सीताराम कुंटे यांना आरोपी समन्स जारी


ॲड. निलेश ओझा


ॲड. दीपाली ओझा


ॲड. ईश्वरलाल अग्रवाल


अंबर कोयरी

**साहसिक वृत्त / ४ नोव्हेंबर**

**मुंबई :** लस कंपन्यांना गैरफायदा पोहचविण्यासाठी फौजदारी कट रचून लस सक्तीचे गैरकायदेशीर नियम आणून नागरिकांच्या मृत्युस कारणीभूत ठरणे, लस सुरक्षित असल्याचे खोटे सांगून नागरिकांची फसवणूक करने आदी विविध गुन्ह्यामध्ये प्रथमदर्शनी पुरावे आढळल्याने न्यायालयाने तिन्ही आरोपींविरुद्ध भादवि १६६, १६७, ४२०, ३०४-A, १२०(B), ३४ तसेच आपत्ती निवारण कायदा २००५ चे कलम ५१(b), ५४ आणी ५५ आदी कलमांअंतर्गत समन्स जारी करण्याचे आदेश दिले आहेत. वरील गुन्हयांमध्ये आरोपींना ७ वर्ष कारावासाची शिक्षा होवू शकते.

नुकतेच मुंबई व केरळ उच्च न्यायालय आणी सर्वोच्च न्यायालयानेही कोव्हीड लसींच्या दुष्परिणामामुळे मृत्यू पडलेल्या मुलांच्या परिवारातील सदस्यांना नुकसान भरपाई देणे व ती नुकसान भरपाई दोषी लस कंपनीचे मालक बिल गेट्स व अदार पुनावाला सारख्या लोकांकडून वसूल कारण्यासंबंधी याचिकेमध्ये सरकार, दोषी डॉक्टर व लस कंपनीचे मालक यांना नोटीसेस जारी केल्या आहेत.

आरोपींविरुद्ध भा.द.वि. ४०९, ११५, ३०२, ३०४ आदी कलम वाढविण्यासाठी फिर्यादी-तर्फे लवकरच उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात येणार आहे. या गुन्हयांमध्ये आरोपींना या गुन्हयांमध्ये आरोपींना आजीवन कारावास किंवा फाशीची शिक्षा पण होवू शकते.

मास्क निर्बंधातुन नागरिकांकडून कोट्यावधी कपयांची अवैध वसुली केल्याप्रकणी दोषी अधिकाऱ्यांविरुद्ध लवकरच खंडणीच्या गुन्हयात फौजदारी कारवाई केली जाणार असल्याची माहिती याचिकाकर्ते यांनी दिली आहे.

मुंबई विशेष संवाददाता:- याब-ाबत सविस्तर वृत्त असे की, को-रोनाची लस घेतल्यामुळे कोणतेही खात्रीलायक संरक्षण मिळत नसून लस घेणारा व्यक्ती कोरोना संक्रमीत होऊन दुसऱ्यांना कोरोनाचा प्रसार करू शकतो व तो कोरोनाने मरू सुधा शकतो. त्याशिवाय कोरोना लसींचे जीवघेणे दुष्परिणाम असून लस घेणाऱ्यांमध्ये हृदयविकाराने (Heart Attack) मृत्यू होण्याचे प्रमाण व मधुमेह (डायबिटीज), किडनी फेल्यूअर (डायलिसीस) पक्षाघात, लकवा, मस्तीष्क संबंधी आजार आदी रोगांचे प्रमाण प्रचंड वाढले आहेत.

तसेच कायदयातील तरतुदीनुसार कोणत्याही व्यक्तीस लस घेण्याची सक्ती केली जावू शकत नाही किंवा लस घेतली नाही म्हणून त्याला कोणत्याही सुविधा नाकारता येत नाहीत.

परंतु महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्य सचिव सीताराम कुंटे, मुंबई महानगरपालिका आयुक्त इकबाल चहल व अति. आयुक्त सुरेश काकाणी यांनी लस कंपन्यांच्या हजारो कोटींचा गैरफायदा व्हावा या दुष्ट हेतूने फौजदारी कट रचून लस पूर्णतः सुरक्षित आहे व ती घेतल्याने कोरोना होणार नाही असा खोटा प्रचार करून लोकांचे लसीकरण केले व महाराष्ट्र राज्यातील नागरिकांवर बेकायदेशीरपणे विविध निर्बंध लादून त्यांना लस घेण्यास भाग पाडले.

उद्धव ठाकरे यांच्या काळातील सीताराम कुंटे यांचे आदेश असंवैधानिक व बेकायदेशीर असल्याचे मुंबई उच्च न्यायालय व सर्वोच्च न्यायालयानेही घोषीत केले. [Feroze Mithiborwala v. State of Maharashtra, 2022 SCC OnLine Bom 456 (28 February, 2022), Feroze Mithiborwala v. State of Maharashtra, 2022 SCC OnLine Bom 457 (02 March, 2022), Jacob Puliyel Vs. Union of India and Ors. 2022 SCC OnLine SC 533].

आरोपींच्या बेकायदेशीर निर्बंधामुळे मुंबई लोकल ट्रेन मधून प्रवास करण्यासाठी लस घेणारा युवक हितेश कडवे (वय २३) याचा मृत्यू दोन तासातच झाला.

त्यामुळे 'अव्हेकन इंडिया मुव्हमेंट' राष्ट्रीय समितीचे सदस्य श्री. अंबर कोईरी यांनी दिनांक ११th November,२०२१ रोजी आधी रीतसर नोटीस व तक्रार देऊन आरोपींना त्यांचे गैरकृत्य त्वरित थांबविण्यास सांगितले.

परंतु भ्रष्टाचाराने बरबटलेल्या आरोपींना सत्तेचा एवढा माज चढला होता की त्यांनी नोटीसला कोणतेही उत्तर न देता आपले गुन्हेगारी कृत्य सुरू ठेवले त्यानंतर फिर्यादीने मुलुंड न्यायालयात तक्रार दाखल केली.

प्रकरण जेव्हा सुनावणीस आले तेव्हा फिर्यादी तर्फे त्यांचे वकील एडवोकेट ईश्वरलाल अगरवाल यांनी पुरावे आणि उच्च व सर्वोच्च न्यायालयाच्या निवाड्याच्या आधारावर न्यायालयास पटवून दिले कि आरोपींविरुद्ध कठोर कारवाई आवश्यक आहे जेणेकरून यापुढे भविष्यात अश्या अधिकाऱ्यांच्या लालची व गुन्हेगारी कटामुळे जनतेच्या पैशाचा दुरुपयोग होवू शकणार नाही आणी लोकांचे जीवसुद्धा जाणार नाहीत .

न्यायालयाने युक्तिवाद मान्य करून आरोपींविरुद्ध इश्यू प्रोसेसचे आदेश पारीत केले. त्यामुळे आता तीन्ही आरोपींना न्यायालयात हजर होवून जामीनसाठी अर्ज करावा लागणार आहे.

या प्रकरण्यात फिर्यादीने नुकसान भरपाईचीही मागणी केली आहे.

कोरोना लस माफिया व जागतिक आरोग्य संगठना च्या भ्रष्ट कारभारा विरुद्ध इंडियन बार असोसिएशन चे ॲड. निलेश ओझा, ॲड. दीपाली ओझा व इतर सदस्यांनी मागील दोन वर्षांपासून लढा सुरुठेवला असून त्याला देशाचं नव्हे तर जगभरातील वकील, डॉक्टर्स, सामाजिक कार्यकर्ते, मीडिया आदी लोकांनी अपार समर्थन दिले आहे. ॲड. ईश्वरलाल अग्रवाल यांनी तक्रारदाराची बाजू मांडली आणि त्यांना खालील वकिलांनी मदत केली;

ॲड. मीना ठाकूर, ॲड. सोहन अगाटे, ॲड. प्रतीक जैन सकलेचा,ॲड. अभिषेक मिश्रा, ॲड. दीपिका जैस्वाल, ॲड. शिव मिश्रा, ॲड. स्नेहल सुर्वे, ॲड. सौरव खन्ना, ॲड. विकास पवार.

### आरोपीविरुद्ध आदेश करण्यात आलेले गुन्हे संक्षिप्तमध्ये खालीलप्रमाणे आहेत

* भादवी चे कलम १६६ (कायद्यातील निर्देशांचे उल्लंघन करणे.)
* १६७ (लस न घेतलेल्या लोकांना पोहोचविण्याच्या दुष्ट हेतू चुकीचे नोंदी रिकॉर्ड करणे.)
* ३०४-A ( मनमानी कृत्यांद्वारे नागरिकांच्या मृत्यूस कारणीभूत ठरणे.)
* ४२० (लस सुरक्षित असल्याचे खोटे सांगून फसवणूकीने नागरिकांना लस घेण्यास भाग पाडणे.)
* १२०(B) ( सर्व गुन्हे पूर्णत्वास नेण्यासाठी तिन्ही आरोपींनी मिळून फौजदारी कट रचणें.)

### आपत्ति निवारण कायद्यातील कलम :

* कलम ५१(b):- केंद्र सरकारच्या कोव्हीड लस मार्गदर्शन नियमावलीतील निर्देशांचे उल्लंघन करने
* ५४. कलम लस न घेतलेल्या लोकां संबंधी व कोरोंना महामारी संबंधी खोट्या बातम्या पसरवून भीती निर्माण करण्याचा प्रयत्न करणे.
* ५५. आरोपी अधिकाऱ्यांच्या वरिष्ठांनी त्याला गैरकृत्य व गुन्हे करण्यापासून न रोखल्यामुळे सर्व वरिष्ठ अधिकारी शिक्षेसाठी पात्र असणे.

### दिनविशेष

तुलसी विवाहारंभ

### सुविचार

जर तुम्ही नेहमीच सार्वसाधारण जीवन जगण्याचा प्रयत्न करीत असालं तर, तुम्हाला कधीच हे उमजणार नाही कि, तुम्ही किती असामान्य आहात.

### चारोळी

सांग हळूच कानात ,
येऊन सारे
तुझ्याही मनात ,
काहीतरी आहे

### हसा जरा जपून..

ती म्हणाली प्रेमात प्रत्येकाने ताजमहाल बन-वायची काही गरज नाही, रोज भांडी घासली आणि कपडे धुतले तरी खुप झालं

## मंत्रालयाच्या गेटवर अडवणाऱ्या पोलीस कर्मचाऱ्याला संतोष बांगर यांची शिवीगाळ

**वृत्तसंस्था / ४ नोव्हेंबर**

**मुंबई :** शिंदे गटातील हिंगोलीचे आमदार संतोष बांगर पुन्हा एकदा वादात अडकले आहेत. संतोष बांगर यांनी मंत्रालयाच्या गेटवरील पोलीस कर्मचाऱ्यांना शिवीगाळ केल्याचा आरोप आहे. मंत्रलायात जाताना सोबत असणाऱ्या कार्यकर्त्यांना पोलीस कर्मचाऱ्याने थांबवत पास काढण्यास सांगितल्याने संतोष बांगर संतापले आणि शिवीगाळ केल्याचा आरोप आहे.

२७ ऑक्टोबरला ही घटना घडल्याची माहिती आहे. संतोष बांगर आपल्या १५ कार्यकर्त्यांसोबत मंत्रालयात जात असताना गेटवर कॉन्स्टेबलने त्यांना अडवलं. पोलीस कर्मचाऱ्याने कार्यकर्त्यांचा पास काढण्यास सांगितल्याने संतोष बांगर संतापले. त्यांनी त्या कर्मचाऱ्यासोबत वाद घातला आणि आपल्याला ओळखत नाही का? अशी विचारणा केली. पोलीस कॉन्स्टेबलने यासंदर्भात वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्याकडे तक्रार केली आहे. संतोष बांगर यांनी मात्र हे आरोप फेटाळले आहेत.

**संतोष बांगर यांचं म्हणणं काय?**

'मी कोणत्याही प्रकारे पोलीस

(उर्वरित पान २ वर)

## 'आप'कडून माजी पत्रकाराला मुख्यमंत्रीपदाची उमेदवारी



**वृत्तसंस्था / ४ नोव्हेंबर**

**नवी दिल्ली :** मागील काही दिवसांपासून आम आदमी पार्टीचे अनेक नेते गुजरातमध्ये तळ ठोकून बसले आहेत. गुजरात विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर 'आप'कडून जोरदार प्रचार केला जात आहे. आज अखेर आम आदमी पार्टीने गुजरामधील मुख्यमंत्री पदाचा उमेदवार घोषित केला आहे. माजी पत्रकार इसुदान गढवी हे आम आदमी पार्टीचे मुख्यमंत्री पदाचे उमेदवार असणार आहेत. दिल्लीचे मुख्यमंत्री आणि आम आदमी पार्टीचे प्रमुख अरविंद केजरीवाल यांनी आज इसुदान गढवी यांच्या नावाची घोषणा केली.

**नेमकी निवड कशी झाली?**

गुजरातचा मुख्यमंत्री कोण असावा? यासाठी आम आदमी पार्टीने एक सर्वेक्षण घेतलं होतं. यामध्ये जवळपास १६ लाख ४८ हजार ५०० लोकांनी सहभाग घेतला. यातील ७३ टक्के लोकांनी इसुदान गढवी हे मुख्यमंत्री असावेत, अशी इच्छा व्यक्त केली. त्यानुसार आज इसुदान गढवी यांच्या नावाची घोषणा करण्यात आली आहे. याआधी पंजाबचा मुख्यमंत्री कोण असावा? यासाठीही 'आप'ने अशाच प्रकारचं सर्वेक्षण केलं होतं.

इसुदान गढवी यांनी गेल्यावर्षी जूनमध्ये पत्रकारिकतेला रामराम ठोकला होता. त्यानंतर त्यांनी आम आदमी पार्टीत प्रवेश केला. गुजरात 'आप'चे प्रमुख गोपाल इटालिया हेही मुख्यमंत्रीपदाच्या उमेदवारीसाठी शर्यतीत होते. मात्र, ७३ टक्के मतं इसुदान गढवी यांनी मिळाली आहेत. त्यानुसार जनतेचा कौल विचारात घेऊन गढवी यांच्या नावाची घोषणा करण्यात आली.

मुख्यमंत्रीपदाच्या उमेदवारीसाठी घोषणा झाल्यानंतर गढवी यांनी ट्विटरवर प्रतिक्रिया दिली. 'माझ्यासारख्या सामान्य व्यक्तीवर विश्वास ठेवून एवढी मोठी जबाबदारी दिली, त्यासाठी आम आदमी पार्टी, अरविंद केजरीवाल आणि विशेषत: गुजरातमधील जनतेचं मन:पूर्वक धन्यवाद देतो. मी सदैव लोकांचा सेवक बनून लोकहिताची कामं करत राहील.'

## पंजाबमध्ये शिवसेना नेते सुधीर सुरी यांची गोळ्या घालून हत्या, आरोपीला अटक



**वृत्तसंस्था / ४ नोव्हेंबर**

**अमृतसर:** पंजाबमधील अमृतसरमधून धक्कादायक बातमी समोर आली आहे. येथील शिवसेना नेते सुधीर सुरी यांच्यावर गोळीबार करण्यात आला आहे. या घटनेत सुधीर सुरी गंभीर जखमी झाले होते. त्यानंतर सुरी यांना रुग्णालयात दाखल करण्यात आलं असता मृत घोषित केलं.

अमृतसर येथील गोपाळ मंदिराच्या बाहेर कचऱ्यात देवा-ंच्या मुर्ती सापडल्या होत्या. यावरून मंदिराच्या बाहेर सुधीर सुरी आंदोलनाला बसले होते. तेव्हाच गर्दीतून आलेल्या एकाने त्यांच्यावर गोळीबार केला. या घटनेत सुधीर सुरी गंभीर जखमी झाले आहेत. घटनेनंतर आनन-फानन रुग्णालयात सुधीर सुरी यांना दाखल करण्यात आलं होतं. मात्र, डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केलं. घटनेनंतर पोलिसांनी आरोपीला अटक केल्याची माहिती दिली आहे.

सुधीर सुरी यांना तीन ते चार गोळ्या लागल्याची शक्यता वर्तवली जात होती. मागील काही दिवसांपासून सुधीर सुरी यांच्यावर हल्ला करण्याचा कट रचला जात होता. त्याची कुणकूण लागताच पोलिसांनी काही लोकांना अटक सुद्धा केली होती.

## राष्ट्रवादीचे १२ आमदार फुटले, फक्त मुहुर्त ठरायचाय



**वृत्तसंस्था / ४ नोव्हेंबर**

**मुंबई:** राष्ट्रवादीचे बारा नेते फुटले आहेत, फक्त मुहुर्त ठरायचा आहे. सोलापूरमधील मोठा नेता फुटणार आणि विरोधकांना मोठा दणका बसणार आहे. फक्त थोडं थांबा वाट पहा असा इशारा काय झाडी, काय डोंगार या वाक्याने प्रचंड प्रसिद्धीझोतात आलेले आमदार शहाजी पाटील यांनी आज दिला.

**आमदार सरकारमागे**

शहाजी पाटील म्हणाले, १७० आमदार मजबूतपणाने शिंदे फडणवीस सरकारच्या मागे उभे आहेत. सर्व आमदार आपल्या मतदार संघात काम चांगले करी-त आहेत. त्यांना निधी मिळत आहे, जनतेची कामे होताना दिसत आहेत. राष्ट्रवादीचे १२ नेते फुटले आहे पण मुहुर्त अजून ठरला नाही तो लवकरच ठरेल.

**थोडं थांबा मग बघा**

शहाजी पाटील म्हणाले, सोलापूर जिल्ह्यातील मोठ्यात मोठा नेता लवकरच फुटेल, तो विरोधकांना मोठा दणका बसणार

(उर्वरित पान २ वर)

## दिल्ली-एनसीआरमध्ये वायू प्रदुषणाने गाठली गंभीर पातळी; नोएडामध्ये पहिली ते आठवीपर्यंत शाळा ऑनलाईन!




**वृत्तसंस्था / ४ नोव्हेंबर**

**नवी दिल्ली :** दिल्ली-एनसीआर मध्ये प्रदुषणाने गंभीर पातळी गाठली असून हवेची गुणवत्ता सातत्याने खालावत आहे. हे सर्वांसाठीच अत्यंत धोकादायक बनत आहे. मोठ्यांच्या तुलनेत लहान मुलांना याचा अधिक धोका जाणवत आहे. या पार्श्वभूमीवर आता स्थानिक प्रशासनाकडून काही तातडीची पावलं उचलली जात आहेत. याचाच एक भाग म्हणून आता गौतमबुद्ध नगरमध्ये इयत्ता पहिली ते आठवीपर्यंतचे वर्ग ऑनलाईन पद्धतीने सुरू ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

८ नोव्हेंबरपर्यंत ही व्यवस्ता अनिवार्य स्वरूपात लागू असणार आहे. यासंबधीचा शासकीय आदेश जारी करण्यात आला आहे. तर या आदेशात असेही म्हटले आहे की, इयत्ता नववी ते बारावीच्या वर्गांचेही ऑनलाईन वर्ग सुरू केले जाऊ शकतात.

दिल्ली-एनसीआरमध्ये हवेची गुणवत्ता सातत्याने घसरत आहे. एअर क्वालिटी इंडेक्स सद्यस्थितीस नोएडा(यूपी) मध्ये ५६२ गंभीर श्रेणी, गुरुग्राम(हरियाणा) – ५३९ गंभीर श्रेणी आणि दिल्ली विद्यापीठ परिसर ५६३- गंभीर श्रेणीत आहे. दिल्लीचा एकूण एअर क्वालिटी इंडेक्स सध्या ४७२ वर गंभीर श्रेणीत आहे.

गौतमबुद्ध नगर जिल्हा शाळा निरीक्षक(डीआयओएस) धर्मवीर सिंह यांच्याद्वारे जारी करण्यात आलेल्या आदेशानुसार, शाळांना सूचित करण्यात आले आहे की, जर शक्य असेल तर इयत्ता नववी ते बारावीपर्यंतचे वर्गही ऑनलाईन केले जावेत. याशिवाय वर्गाबाहेर कार्यक्रम जसे की प्रार्थना, मैदानी खेळ आदींवर पूर्णपणे निर्बंध आणण्यात आले आहेत. धर्मवीर सिंह यांनी म्हटले की, सर्व शाळांना इयत्ता आठवीपर्यंतचे वर्ग ऑनलाईन पद्धतीने घेण्याचे निर्देश दिले जात आहेत. याशिवाय त्यांना शक्य झाल्यास इयत्ता नववी ते बारावीपर्यंतचे वर्गही ऑनलाइन स्वरूपात घेण्यास सांगितले आहे.

दिल्ली आणि राष्ट्रीय राजधानी परिसरामध्ये (एनसीआर) हवेची पातळी आणखी खालावल्यानंतर तातडीचे उपाय योजण्यात आले आहेत. 'श्रेणीबद्ध प्रतिसाद

(उर्वरित पान २ वर)

## पान १ वरुन...

### मंत्रालयाच्या गेटवर अडवणाऱ्या पोलीस कर्मचाऱ्याला संतोष बांगर यांची शिवीगाळ

कर्मचाऱ्याशी हुज्जत घातली नाही. मी काही कार्यकर्त्यांसोबत मंत्रालयात जात असताना तेथील पोलीस कर्मचाऱ्याने डायरीत प्रवेशाची नोंद करण्यास सांगितलं. यावेळी एका कार्यकर्त्याने सोबत आमदार असल्याचं सांगितलं. त्या कर्मचाऱ्याने मला ओळखलं नव्हतं. पण ओळखल्यानंतर सन्मानाने मला आत पाठवलं. माझ्या पीएने नंतर डायरीत नोंद केली. आम्ही कोणतीही हुज्जत घातली नाही,' असा दावा संतोष बांगर यांनी केला आहे. 'हुज्जत घातली असेल तर सीसीटीव्ही कॅमेरे तपासा,' असंही ते म्हणाले.

तर त्यांच्या कानाखाली आवाज काढा' बंडखोर आमदार संतोष बांगर यांचा धमकीवजा इशारा

'मी कशासाठी पोलीस कर्मचाऱ्याशी हुज्जत घालेन. तो बिचारा कर्मचारी सकाळपासून तिथे काम करत असतो. कर्तव्य बजावणाऱ्या त्या कर्मचाऱ्याशी मी हुज्जत घातली नाही,' असा बांगर यांचा दावा आहे.

अंबादास दानवेंची टीका

'संतोष बांगर आणि वाद हे एकत्र नांदणारे आहेत. मुख्यमंत्र्यांनी समज देऊनही ते ऐकत नाहीत,' अशी टीका विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी केली आहे. दरम्यान मला मुख्यमंत्र्यांनी कोणतीही समज दिलेली नसून, त्या सर्व बातम्या चुकीच्या होत्या असं प्रत्युत्तर बांगर यांनी दिलं.

शासकीय कर्मचाऱ्याला मारहाण करणाऱ्या संतोष बांगर यांना एकनाथ शिंदेंकडून समज, म्हणाले 'तुमचा मुद्दाष्ठ'

'छत्रपती शिवाजी महाराज आणि बाळासाहेबांनी मला अन्यायाविरोधातील लढा देण्याची शिकवण दिली आहे. ते काम मी करत आहे. पण पोलीस कर्मचाऱ्याशी कोणताही वाद घातलेला नाही,' असं बांगर म्हणाले.

संतोष बांगर आणि वाद

संतोष बांगर याआधीही वादामुळे चर्चेत आले आहेत. शिंदे गटात सहभागी झाल्यापासून ते तिसऱ्यांदा वादात अडकले आहेत. याआधी मध्यान्ह भोजन योजनेअंतर्गत डबे पुरवणार्या गोडाऊन व्यवस्थापकाला त्यांनी मारहाण केली होती. हा वाद चांगलाच पेटला होता. तसंच एका उपहारगृहाच्या व्यवस्थापकाला शिवीगाळ आमि मारहाण केल्यानेही वादात अडकले होते.

### राष्ट्रवादीचे १२ आमदार फुटले, फक्त मुहुर्त ठरायचाय

आहे. थोड थांबा पुढे पाहा काय होते ते बघा ठरलेले आहे.

**राष्ट्रवादीचे आमदार आमच्या संपर्कात**

सामंत म्हणाले, एखादा पक्ष जेव्हा सत्तेत नसतो, तेव्हा कार्यकर्त्यांना मॉरल सपोर्ट देणे गरजेचे असते. अन्यथा कार्यकर्तेच सोडा आमदारही सैरभैर होतात. अनेक आमदार हे शिंदे फडणवीसांच्या संपर्कात असल्याने आमदार सैरभैर होऊ नये म्हणून त्यांना आपली सत्ता लवककरच येईल, विद्यमान सरकार पडेल असे सांगावे लागते.

**सत्ता राष्ट्रवादीसाठी दिवास्वप्न**

सामंत म्हणाले, राष्ट्रवादी कॉंग्रेससाठी सत्ता हे दिवास्वप्न ठरणार आहे. त्यांचे २०२५ हे वर्षही सत्तेसाठी दिवा स्पप्न ठरणार आहे. बाळासाहेबांच्या शिवसेनेचे दर पाच वर्षांनी सत्ता येईल आणि आमचेच मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री पंढरपुरच्या विठ्ठलांची पूजा करणार आहे.

### दिल्ली-एनसीआरमध्ये वायू प्रदुषणाने गाठली गंभीर पातळी; नोएडामध्ये पहिली ते आठवीपर्यंत शाळा ऑनलाईन!

कृती आराखडा' (जीआरएपी) अंतर्गत डिझेलवर चालणाऱ्या वाहनांना बंदी घालण्यात आली असून ट्रकना प्रवेशबंदी करण्यात आली आहे. दुसरीकडे खराब हवेमुळे दवाखान्यांमध्ये श्वसनाच्या विकारांवरील रुग्णांची गर्दी वाढताना दिसत आहे.

## पान ८ वरुन...

### ओबीसींच्या विद्यार्थ्यांनी काय पाप केलय!

आधार योजना सुरू करून, वर्षाकाठी ८० हजार निधी द्यावा, अशी मागणी करण्यात येत आहे,

महाज्योतीचे अध्यक्ष असलेले व ओबीसी ओबीसी म्हणुन गर्जना करणारे मंत्री विजय वडेट्टीवार यूंनी, त्यांच्या काळात ओबीसींची वसतीगृहे व अशाच प्रकारची विद्यार्थ्यांसाठीआधार योजना सुरू करण्याची मोठी संधी गमावली.ओबीसी उपाययोजना मंत्रीमंडळ उपसमितीचे तत्कालीन अध्यक्ष मा. श्री. छगन भुजबळ साहेब,
यांनी महाराष्ट्रात ओबीसींसाठी वसतीगृह नसल्यामुळे, त्यांना एस सी एस टी च्या धर्तीवर आधार योजना सुरू करावी अशी शिफारस दोन वर्षापुर्विच केली होती. पण ओबीसी मंत्री म्हणुन, विजय वडेट्टीवार यांनी निव्वळ घोषणा दिल्यात, पण ही योजना सुरू करण्याकडे पुर्णता दुर्लक्ष केले.एवढेच नाही, तर तत्कालीन मुख्यमंत्री उध्दव ठाकरे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिनांक २.९.२०२१ च्या दिलेल्या निर्देशाप्रमाणे प्रमाणे,महाज्योतीच्या वतीने तत्काळ, शासन खर्चातुन ७२ वसतीगृहे सुरू करावी,ती होत नसेल, तर आधार योजना सुरू करावी, असे निर्देश दिले. तसे पत्र महाज्योतीला दिनांक २०.१०.२०२२ ला दिले. महाज्योतीने तशी तयारी केली. पण ओबीसी मंत्रालयाचे सचिव नंदकुमार यांनी, ही वसतीगृहे खाजगी संस्थाना चालविण्यास द्यावी, अशी योजना मांडुन, ओबीसी मंत्र्यात संभ्रम निर्माण करून, शेवटी ही वसतीगृहे बारगळली. पण ही वसतीगृहाची योजना नसतांना मंत्री विजय वडेट्टीवार यांनी ओबीसी उपाययोजना मंत्रीमंडळ उपसमितीच्या ठरावाप्रमाणे, ओबीसीसाठी आधार योजना सुरू करण्यास अजिबात स्वारस्य दाखविले नाही,व ओबीसी विद्यार्थ्यांवर अन्याय केला,हे त्यांचे ओबीसी मंत्री म्हणुन फार मोठे अपयश आहे.

महाज्योतीच्या दिनांक १ जुलै च्या सभेत ओबीसी विद्यार्थ्यांसाठी ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना सुरू करावी,बाहेरगावी शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना वर्षाकाठी ८० हजार आधार निधी द्यावा, असा ठराव महाज्योतीचे तत्कालीन संचालक प्रा. दिवाकर गमे यांनी आणला. त्यासाठी आवश्यक निधी सुध्दा राज्यशासनाकडुन मिळवला होता.पण महाविकास आघाडीचे सरकार पडले,व महाज्योतीची मिटींगच रद्द झाली. आणि पुढे भाजप सरकारने महाज्योतीवरील अशासकीय संचालकांच्या नेमणुकाही रद्द केल्यात, ही ओबीसींची आधार योजना पुढील संचालक मंडळात मंजुर करावी, असे पत्र महाज्योतीचे माजी संचालक प्रा. दिवाकर गमे यांनी मंत्री अतुल सावे यांना दिले. तर माजी उपमुख्यमंत्री छगन भुजबळ यांनी सुध्दा २५ ऑगस्टला तसेच पत्र दिले. पण ओबीसी मंत्री अतुल सावे यांनी आपण कट्टर संघ धार्जीने आहोत, हे दाखवण्यासाठी महाज्योतीच्या त्यांच्या पहिल्यात सभेत ही ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजनाच रद्द केली. व ओबीसी विद्यार्थ्यांना वाऱ्यावर सोडले.

आज महाज्योतीची रद्द केलेली ज्ञानज्योती आधार योजना उच्च व शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी मराठा समाजासाठी लागु करून, वर्षासाठी ६० हजार रूपये निर्वाह भत्ता योजना सुरू केली आहे. आणि ओबीसी मंत्री अतुल सावे मात्र, चंद्रकांत पाटील यांना त्यातले समजले नाही,गैरसमज झाला असे सांगतात,व ओबीसी विद्यार्थ्यांची फसवणुक करतात.

ओबीसी विद्यार्थ्यांचा मंत्री अतुल सावे, व राज्य शासनास सवाल आहे,की ओबीसी विद्यार्थ्यांनी असे कोणते पाप केले आहे, की निव्वळ घोषणा करून, राज्य सरकार आणि फोलकट ओबीसी मंत्री, ओबीसी विद्यार्थ्यांची अशी अडवणुक करीत आहेत.

म्हणुन ओबीसी मंत्री अतुल सावे यांनी महाज्योतीच्या वतीने किंवा शासनाच्या वतीने ओबीसी विद्यार्थ्यांसाठी तत्काळ ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना सुरू करून वर्षाकाठी ८० हजार रूपये बाहेरगावी शिक्षणासाठी निधी द्यावा, अशी मागणी महाज्योतीचे माजी संचालक व प्रदेश राष्ट्रवादीचे उपाध्यक्ष प्रा.दिवाकर गमे यांनी केलेली आहे. केवळ ओबीसींमुळेच आपण आज या पदावर आहोत, असे प्रतिपादन करणारे, महाराष्ट्राचे सध्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणविस यांना सुध्दा निवेदन देण्यात आले आहे.

# प्रा.वाघमारे यांना निवृत्तीनिरोप समारंभ



**साहसिक वृत्त / ०४ नोव्हेंबर**

**समुद्रपूर :** स्थानिक विध्याविकास कला वाणिज्य विज्ञान महाविद्यालयातील सायन्य विभागातील गणित विषयाचे शिक्षक प्रा.वाल्मिक वाघमारे यांचा आज निरोप समारोप आयोजित करण्यात आला होता.

संस्था अध्यक्ष पांडुरंग तुळसकर यांचे अध्यक्षतेखाली तर सचिव डॉ. उमेश तुळसकर, प्राचार्य डॉ. किशोरचंद्र रेवतकर, उपप्राचार्य नयना शिरभाते, पर्यवेक्षक प्रा.किरण वैद्य यांचे प्रमुख उपस्थित पार पडला. गणित विषयतज्ञ प्रा.वाल्मिक वाघमारे महाविद्यालयाचे आदर्श शिक्षक होते.शिस्तप्रिय शिक्षक म्हणून विद्यार्थ्यांन मध्ये प्रिय होते प्रदिर्घ सेवेनंतर त्यांना आज निरोप देण्यात आला यावेळी संस्थेच्या व महविद्यालयाचे वतीने त्यांना मानपत्र, शाल श्रीफळ व भेटवस्तु देऊन सन्मानाने निरोप देण्यात आला.

ग्रामीण भागात विज्ञान शाखा टिकवणे अवघड असतांना या कढिन परीस्थिती वाघमारे सरांनी विज्ञान विभागाचा दर्जा सुधारण्यासाठी मोलाचे सहकार्य केल्याचे संस्थेचे सचिव डॉ. उमेश तुळसकर म्हणाले .प्राचार्य डॉ. किशोरचंद्र रेवतकर व कर्मचार्यांनी प्रा.वाघमारे यांना शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा विलास बैलमारे यांनी केले तर आभार प्रा.मेघशाम ढाकरे यांनी मानले. कार्यक्रमाचे यशस्वीते सा'ी डॉ. राजविलास कारमोरे, डॉ. रमेश निखाडे, डॉ. राजेशाम वेलुपुला, डॉ. विठोबा चंदनखेडे, डॉ. सदानंद सार्वे, डॉ. प्रमोद अलोने,डॉ. प्रकाश टले, डॉ. नितीन अखुज, डॉ. अर्चना भेंडे, डॉ. सिल्पा समदूरकर, डॉ. सार्वे डॉ. मंगला खुने, प्रा.विलास बैलमारे, प्रा.अजय मोहोड, प्रा.फारीश अली, प्रा.मनोज कोरेकर, प्रा. घनशाम कदमधाड, प्रा. मनोजखेकरे, प्रा.महेश चिव्हाने,. प्रा राजेश बाभुलकर प्रा.रतन आस्कर, प्रा.दिपक वालदे, धनेश रंगारी, आशिष पाटील, इश्वर ठाकरे, बंटी तेलतुंबडेसह अनेकांनी त्यांना पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्यात याकार्यक्रमाला वरिष्ठ, कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी, विद्यार्थीनी उपस्थित होते.

# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा टेनिस (पुरुष) संघ घोषित

खामगाव येथे खेळाडूंचे १३ नोव्हेंबरपासून प्रशिक्षण शिबिर

**साहसिक वृत्त / ०४ नोव्हेंबर**

**अमरावती :** मुंबई विद्यापीठाच्या बी.के.बिर्ला कॉलेज,कल्याण जि.ठाणे येथे दिनांक २६ ते ३० नोव्हेंबर दरम्यान होणा-या पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ टेनिस (पुरुष) स्पर्धेसाठी संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा संघ घोषित झाला आहे. या खेळाडूंचे प्रशिक्षण शिबिर दिनांक १३ ते २२ नोव्हेंबर २०२२ दरम्यान खामगाव येथील जी.एस.सायन्स कॉलेज येथे होणार आहे.

खेळाडूंमध्ये खामगाव येथील जी.एस.सायन्स कॉलेजचा शिमोन शास्त्री, मोहंमद मुस्तफा काझीम, हितेश दासमलानी व धर्निधर मिश्रा, डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन, अमरावतीचा शाहीर फरहाज, तर राखीवमध्ये विद्याभारती महाविद्यालय, अमरावतीचा अनुज शिंगरोळ, श्री शिवाजी कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, अकोलाचा पवन बिडकर यांचा समावेश आहे.

सर्व खेळाडूंनी खामगाव येथील जी.एस.सायन्स कॉलेज येथे होणा-या प्रशिक्षण शिबिराला उपस्थित रहावे, असे आवाहन संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या क्रीडा व शारीरिक शिक्षण विभागाचे संचालक डॉ. अविनाश असनारे यांनी विद्यापीठाच्या वतीने केले आहे.

# तळोदी येथे नागरिकांना दिवाळी सिधा वितरण अंतिम टप्प्यात



**साहसिक वृत्त / ०४ नोव्हेंबर**

**तुळजापूर वघाळा (वा):** सेलू तालुक्यातील तळोदी ( कुटकी) येथील स्वस्त धान्य दुकानात महाराष्ट्र शासनाचा सामान्य नागरिकांना दिवाळी भेट म्हणून चणा डाळ.रवा. तेल आणि साखर आदी वस्तूंचे स्वस्त धान्य दुकानाच्या माध्यमातून वितरण दि.४ नोव्हेंबर २०२२ रोजी सकाळी येथील स्वस्त धान्य दुकानदार श्री.लक्ष्मण डेकाटे यांनी स्वस्त धान्य ग्राहकांना दिवाळी निमित्त शासनाने जाहीर केलेल्या सिधा धान्य कीट चे वाटत प करण्यात आले. या प्रसंगी येथील पोलीस पाटील विजय काल्हे व येथील नागरिक उपस्थित होते. उर्वरित धान्य कीट जसजसे उपभोगता येईल तसतसी धान्यी कीट देण्यात येईल आसे मनोगत स्वस्त धान्य दुकानदार श्री लक्ष्मण डेकाटे यांनी व्यक्त केले. या वेळी येथील नागरिक आवर्जून उपस्थित होते.

# मतदार यादीचा विशेष पुनरिक्षण कार्यक्रम जाहिर

९ नोव्हेंबर ते ८ डिसेंबर दरम्यान मतदार यादीबाबत विविध उपक्रम

**साहसिक वृत्त / ०४ नोव्हेंबर**

**वर्धा :** सन २०२३ च्या जानेवारी, एप्रिल, जुलै, ऑक्टोबर महिन्याच्या १ तारखेला किंवा त्याच्या आधी वयाची १८ वर्ष पूर्ण होणा-या तरुणांनी दि.९ नोव्हेंबर ते ८ डिसेंबर या कालावधित राबविण्यात येत असलेल्या मतदार यादीच्या विशेष पुनरिक्षण कार्यक्रम कालावधित मतदार नोंदणी करुन घ्यावी, असे आवाहन तहसिलदार यांनी केले आहे.

विशेष पुनरिक्षण कार्यक्रमादरम्यान दि.९ नोव्हेंबर रोजी एकत्रित मतदार यादी प्रसिध्दी करण्यात येईल. दि.९ नोव्हेंबर ते ८ डिसेंबर पर्यंत दावे व हरकती स्विकारण्यात येईल. दि.१९ व २० नोव्हेंबर आणि दि.३ व ४ डिसेंबर या शासकीय सुटीच्या दिवशी मतदार नोंदणीसाठी विशेष शिबिर घेण्यात येईल. दि.१० नोव्हेंबर रोजी ग्रामसभेत मतदार यादी वाचन व नोंदणी करण्यात येईल. दि.१२ व १३ नोंव्हेबर रोजी विद्यार्थी, दिव्यांग, महिला यासाठी विशेष शिबिर घेण्यात येईल.

दि.२६ व २७ नोव्हेंबरला तृतीयपंथी, देह व्यवसाय करणाऱ्या महिला, घर नसलेले भटक्या व विमुक्त जमातीच्या व्यक्तीसाठी विशेष शिबिर, दि.२६ डिसेंबर रोजी दावे व हरकती निकालात काढण्यात येईल. तसेच दि.५ जानेवारी २०२३ रोजी अंतिम मतदार यादी प्रसिध्दी करण्यात येणार आहे. नव मतदारांना ऑनलाईन मतदार नोंदणी करावयाची असल्यास https://nvsp.in, https://voterportal.eci.gov.in या संकेतस्थळावर जाऊन मतदार नोंदणी करता येणार आहे. किंवा न्द्गी पत्ज्त्ग्हा हे मोबाईल ॲप वापरा येणार आहे. प्रत्यक्ष मतदार नोंदणीसाठी जवळच्या सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी तथा तहसिलदार कार्यालयास भेट देऊन मतदार नोंदणी करता येणार आहे. मतदार यादी पाहण्यासाठी मद.maharashtra.gov.in अथवा electoralsearch.in या संकेतस्थळाला किंवा वोटर हेल्पलाईन या मोबाईल ॲप किंवा मतदार नोंदणी अधिकारी कार्यालयाला भेट द्यावी, असे सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी तथा तहसिलदार वर्धा यांनी कळविले आहे.

# अनुदान वितरणात दिरंगाई करणाऱ्या बँकांवर होणार कारवाई

**साहसिक वृत्त / ०४ नोव्हेंबर**

**वर्धा :** यावर्षी झालेल्या अतिवृष्टीमुळे जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. या नुकसानीची रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्यासाठी बँकांना वाटप करण्यात आली आहे. ही रक्कम शेतकऱ्यांना तातडीने वितरित करणे आवश्यक असतांना काही बँकांकडून दिरंगाई होत असल्याचे निदर्शनास येत आहे. अशी दिरंगाई करणाऱ्या बँकांवर आपत्ती व्यवस्थापन कायद्यांतर्गत कारवाई केली जाणार आहे.

यावर्षी जिल्ह्यात सर्वत्र मोठ्या प्रमाणावर अतिवृष्टी झाली. यात मोठ्या प्रमाणावर शेत पिकांचे नुकसान झाले. जिल्हा प्रशासनाने नुकसानीचे तातडीने पंचनामे करत अहवाल शासनास सादर केला. त्यानुसार नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना वितरित करण्यासाठी शासनाने ३६४ कोटी ६५ लाख रुपये जिल्ह्यास उपलब्ध करून दिले. ही रक्कम नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा करण्यासाठी तहसिलदारांमार्फत बँकांना वितरित करण्यात आली.

जिल्ह्यात झालेल्या अतिवृष्टीत २ लाख ४५ हजार २० शेतकरी बाधित झाले होते. शासनाच्या निकषाप्रमाणे पात्र शेतकऱ्यांना वितरित करण्यासाठी बँकांना देण्यात आलेली रक्कम काही बँका वाटपात दिरंगाई करीत असल्याचे तर काही बँका ही रक्कम स्वतःकडे ठेवून घेत असल्याचे निदर्शनास आले आहे.

सदर अनुदान तातडीने वितरणाचे शासनाचे निर्देश असतांना सुध्दा बँका दिरंगाई करित असल्याने अशा बँकांवर आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ मधील तरतुदीनुसार नुसार गुन्हा दाखल केले जाणार आहे. बँकांनी शेतकऱ्यांना वितरणासाठी तहसिलदारांकडून प्राप्त रक्कम तातडीने शेतकऱ्यांना वितरित करावे, असे निर्देश जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी बँकांना दिले आहे.

**३३० कोटींचे वितरण**

जिल्ह्यातील नुकसानग्रस्त २ लाख ४५ हजार शेतकऱ्यांना वितरित करण्यासाठी ३६४ कोटी ६५ लाख रुपये प्राप्त झाले आहे. यापैकी ३३० कोटी रुपये तहसिलदारांकडून बँकांना वितरीत करण्यात आले आहे. बँकांकडून ही रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात जमा केली जात आहे.

### कंत्राटी आरोग्य सेविकांचा आंदोलनाचा दुसरा दिवस कुटुंबासह जिल्हा परिषद वर्धा समोर आंदोलन

कामावरुन कमी का केले ? अशा विविध अडचणी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांना भेटून सांगण्यात आले त्यामुळे प्रशासनाने कमी केलेल्या यादी चुकीची आहे

यांची चौकशी करण्यात येईल व नव्याने यादी करण्यात येईल असे सांगितले.

केंद्र व राज्य सरकारने कंत्राटी आरोग्य सेविका बाबत योग्य निर्णय घेतला नाहीतर १५ नोव्हेंबर रोजी मंत्रालया समोर आत्मदहन

कंत्राटी आरोग्य सेविकांना कमी करण्याचा निर्णय आयुक्त तुकाराम मुंडे यांचा नाही .केंद्र व राज्य सरकारचा -आयटक नर्सेस युनियनची माहीती राष्टीय आरोग्य अभियान अंतर्गत महाराष्ट्र राज्यात ३२०७ कंत्राटी आरोग्य सेविकांचे पदे मंजूर होती

ङ२०२२-- २३ या वर्षासाठी केंद्र शासना कडे मंजूरी करीता प्रस्ताव आयुक्त आरोग्य अभियान आरोग्य भवन मुंबई यांनी पाठविला होता. मात्र केंद्र सरकारने २६१० पदाना मंजूरी दिली व ५९७ पदाची मंजूरी दिली नसल्यामुळे राज्यभरातील ५९७ कंत्राटी आरोग्य सेविकांच्या कुटुंबावर उपासमारीची वेळ आली आहे ङहा निर्णय आयुक्त तुकाराम मुंडे यांना नसून केंद्र सरकारचा आहे .चुकीची बातमी पसरवू नये अशी मागणी आयटक संलग्न नर्सेस युनियनने केली आहे.

वर्धा जिल्हा परिषदेच्या समोर ४/११/२०२२ रोजी कुटुंबासह आंदोलन केले ,मागील १५ वर्षापासून सेवा देणाऱ्या आरोग्य सेविकांना अचानक १ नोव्हेंबर रोजी कामावरुन कमी केले आहे .हे अन्यायकारक आहे जो पर्यत न्याय मिळत नाही तो आंदोलन सुरु राहील असे आयटक संलग्न नर्सेस युनियन सरचिटणीस संगीता रेवडे यांनी सांगितल. राधा आगलावे मंगला निकोडे सुकेशनी पाटील मनिषा महाबुध्दे शेकडो महिला सहभागी आहेत दर्शना मनवर, शिला भलावी प्रतिक्षा ब. भोग, वनिता सयाम प्रतिक्षा कुमरे जयश्री सुटे स्वेता पाणबुडे सारिका किरडे चंदा कुमरे ललिता आघाव यांनी विचार व्यक्त केले.

### केन्द्र सरकार व राज्यसरकारच्या माध्यमातुन शहरी भागासोबतच ग्रामीण भागाच्या विकासाला चालना मिळेल-खासदार रामदास तडस

जामणी ता सेलू येथील पाणीपुरवठा योजना किमंत रु. ७३.०२ लाख, मदनी येथील पाणीपुरवठा योजना किमंत रु.५७.८४ लाख, आमगाव येथील पाणीपुरवठा योजना किमंत रु. ७५.८३ लाख, क्षिरसमुद्रपुर येथील पाणीपुरवठा योजना किमंत रु.६२.०७ लाख व विविध कामांचे भुमीपूजन कार्यक्रम तसेच क्षिरसमुद्रपुर येथील विविध कामांचा लोकार्पण सोहळा वर्धा लोकसभा मतदार संघाचे खासदार रामदास तडस यांच्या शुभहस्ते संपन्न झाला. कार्यक्रमाला सेलू तालुका भाजपा अध्यक्ष श्री. अशोकभाऊ कलोडे, जि. प. वर्धा माजी सभापती सौ. सोनाली अशोकराव कलोडे, पंचायत समिती सेलू माजी सभापती श्री. अशोक मुडे, सेलू तालुका भाजपा महामंत्री श्री. गुलाबराव राऊत उपस्थित होते.

यावेळी माजी जि.प.सभापती सौ. सोनाली अ.कलोडे, प.स.माजी सभापती अशोक मुडे, भाजपा तालुकाअध्यक्ष अशोक कलोडे यांनी समोयोचीत मार्गदर्शन केले.

यावेळी कार्यक्रमाला आमगांव मदनीचे सरपंच अभय ढोकने, जामनीच्या सरपंच प्रिती गव्हाळे, जामणी तंटामुक्तीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर गव्हाळे, आमगांव तंटामुक्तीचे अध्यक्ष बाळासाहेब मिसाळ, जामनीचे उपसरपंच अनिल येलोरे, आमगांवच्या उपसरपंच सुनिता मडावी, शक्तीकेन्द्र प्रमुख नरेश मुरले व क्षिरसमुद्रपूर येथे सरपंच अतुलजी महाजन, अध्यक्ष दुग्ध संस्था श्री. सतिश चौधरी, सदस्य सौ. रक्षना कांबळे, सदस्य सौ. सुलोचना खुडसंगे, सदस्य, सौ. सिंधुबाई मुंगले, सदस्य महेश खडसे, अध्यक्ष मुनेश्वर गोहणे, माजी सरपंच श्री. जयंतराव भुजाडे, माजी सरपंच सौ. सिंधुबाई खडसे माजी सरपंच सौ. मंदाबाई पांडे, सामाजीक कार्यकर्ते विवेकजी रोकडे, विवेकजी धोटे शक्ती केंद्र प्रमुख, राजु चौधरी माजी सरपंच, बंडुजी लांबाडे माजी सरपंच, विजय मलोंडे अध्यक्ष युवा मोर्चा, विशाल भुते उपाध्यक्ष दुग्ध संस्था, श्यामराव मलोंडे भाजपा, कार्यकर्त्ता, रामदास चौधरी अध्यक्ष सोसायटी, ज्ञानेश्वर गोहणे बुथ अध्यक्ष, सुभाष महाजन उपाध्यक्ष भाजपा, सौ .सुनिता र. मडावी उपसरपंच, श्री. बाळासाहेब मा. मिसाळ अध्यक्ष ,तंटा मुक्त समिती आमगाव, श्री अमोल ना. मानकर ग्रा. सदस्य, श्री सचिन ना. कोवे ग्रा. सदस्य, श्री नरेश नि. चांदोरे ग्रा. सदस्य, सौ.सुनंदा अ. वानखडे ग्रा. सदस्य, सौ. संगीता सिरसकार ग्रा. सदस्य, सौ. सुशीला ध. मोहिते ग्रा. सदस्य, सौ. प्रिया उ. वानखडे ग्रा.सदस्य, वृंदा श्रा. नागोसे ग्रा.सदस्य, व्ही.दा .इमाने सचिव ग्रामपंचायत, योगेश खेडकर पोलीस पाटील, अजू अंभोरे, पोलीस पाटील प्रकाश आडसुळे, सुरेशराव ढोकणे, नारायणराव खेडकर, अनिल दिघडे, शालिक दिघडे, यादव भोंडे, नेमिनाथ भोंडे चंद्रशेखर डोंगरे, पशिल मिसाळ, पिंटू हिवरे, दयाराम पेंदाम, सुरज गवळी, भूषण वंजारी, वनिता चातरकर, अनिता पेंदाम, अर्चना आंबोरे, कविता अंभोरे, वर्षा गौरकार, माधुरी वानखडे व समस्त गावकरी उपस्थित होते.

### वर्ध्येच्या स्वावलंबी मैदानात रंगणार महाकाली शिक्षण संस्था प्रस्तुत क्रिकेट प्रीमियर लीग सीझन ३ चे सामने

आयोजकांचा मेहनतीला उंच भरारी आणि यश देणारा असतो. वॉर्धेकरणसाठी ही एक खुप मोठी आनंदाची बाब आहे. आपला पाठिंबा हा खुप मोठ्या प्रमाणात असावा आणि आम्हाला ैज्त (वर्धा प्रीमियर लीगला ) खुप वरच्या पातळीवर घेऊन जाण्यास मदत करावी अशी कळकळीची विनंती सदस्यांनी प्रेक्षकांना केली आहे.

यामध्ये बऱ्याच मोठ्या प्रमाणात प्रायोजक मंडळ सोबत जुळून आलेत. उद्योजक, व्यावसायीक व्यक्ती याचाशी जुळले आहे. प्रेक्षकांसाठी सर्व सामने ब्द्ल्ूलं वरती लाईव्ह दाखवण्यात येणार असून आपण स्वावलंबी क्रिकेट मैदानावरील पण हे सामने जाऊन (९:०० ते ०५:००) च्या दरम्यान बघू शकता.

प्रेक्षकांचा प्रतिसाद हा आयोजकांचा मेहनतीला उंच भरारी आणि यश देणारा असतो. वॉर्धेकरणसाठी ही एक खुप मोठी आनंदाची बाब आहे. आपला पाठिंबा हा खुप मोठ्या प्रमाणात असावा आणि आम्हाला ैज्त (वर्धा प्रीमियर लीगला ) खुप वरच्या पातळीवर घेऊन जाण्यास मदत करावी अशी कळकळीची विनंती सदस्यांनी प्रेक्षकांना केली आहे.

यामध्ये बऱ्याच मोठ्या प्रमाणात प्रायोजक मंडळ सोबत जुळून आलेत. उद्योजक, व्यावसायीक व्यक्ती याचाशी जुळले आहे. प्रेक्षकांसाठी सर्व सामने ब्द्ल्ूलं वरती लाईव्ह दाखवण्यात येणार असून आपण स्वावलंबी क्रिकेट मैदानावरील पण हे सामने जाऊन (९:०० ते ०५:००) च्या दरम्यान बघू शकता. प्रेक्षकांचा प्रतिसाद हा आयोजकांचा मेहनतीला उंच भरारी आणि यश देणारा असतो. वॉर्धेकरणसाठी ही एक खुप मोठी आनंदाची बाब आहे. आपला पाठिंबा हा खुप मोठ्या प्रमाणात असावा आणि आम्हाला ैज्त (वर्धा प्रीमियर लीगला ) खुप वरच्या पातळीवर घेऊन जाण्यास मदत करावी अशी कळकळीची विनंती सदस्यांनी प्रेक्षकांना केली आहे.

यामध्ये बऱ्याच मोठ्या प्रमाणात प्रायोजक मंडळ सोबत जुळून आलेत. उद्योजक, व्यावसायीक व्यक्ती याचाशी जुळले आहे. प्रेक्षकांसाठी सर्व सामने ब्द्ल्ूलं वरती लाईव्ह दाखवण्यात येणार असून आपण स्वावलंबी क्रिकेट मैदानावरील पण हे सामने जाऊन (९:०० ते ०५:००) च्या दरम्यान बघू शकता. प्रेक्षकांचा प्रतिसाद हा आयोजकांचा मेहनतीला उंच भरारी आणि यश देणारा असतो. वर्धेकराणसाठी ही एक खुप मोठी आनंदाची बाब आहे. आपला पाठिंबा हा खुप मोठ्या प्रमाणात असावा आणि आम्हाला ( वर्धा प्रीमियर लीगला ) खुप वरच्या पातळीवर घेऊन जाण्यास मदत करावी अशी कळकळीची विनंती सदस्यांनी प्रेक्षकांना केली आहे.

### विदर्भ मुख्याध्यापक संघातर्फे नागपूर विभाग शिक्षक मतदार संघाकरिता सतीश जगताप यांची उमेदवारी जाहीर

प्रशासकीय अधिकारी ते शिक्षक प्रतिनिधी लोकप्रतिनिधी शैक्षणिक क्षेत्रातील तज्ञ यांच्या उपस्थितीत १२० ठराव मंजूर करण्यात आले होते ?कोविड काळात शाळाच्या संच मान्यते करिता विद्यार्थ्यांचे आधार कार्ड बंधनकारक केले होते स्थलांतरित विद्यार्थीचे आधार कार्ड मिळविण्याकरिता शिक्षकांना नाहक त्रास सहन करावा लागत होता याबाबत पाठपुरावा करून संच मान्यता २०१८ -१९ ची पूर्ववत ठेवण्यात यश आले होते ? माध्यमिक शाळेतील इयत्ता नववी दहावीला कमीत कमी तीन शिक्षकांची पदे शासनाकडून मंजूर करून घेण्यात यश आले होते? मुख्याध्यापक आणि शिक्षक यांच्या वरिष्ठ श्रेणीच्या सेवांतर्गत प्रशिक्षणाबाबत तत्कालीन शिक्षण संचालक यांच्याकडून मंजूर करून घेण्याबाबत त्यांना यश आले होते? कोरोना काळात सेवानिवृत्त झालेल्या जिल्ह्यातील १८० माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापकांचे आमदारांच्या हस्ते सत्कार समारंभाचे आयोजन त्यांनी केले होते ?बक्षी समिती समोर शिक्षक शिक्षकेतर व मुख्याध्यापक यांचे सहाव्या सातव्या वेतन आयोगातील वेतनश्रेणीबाबत त्रुटी निराकरण करण्यासाठी त्यांच प्रतिनिधित्व होते? मुख्याध्यापक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या प्रश्न सोडविण्यासाठी वेळोवेळी आंदोलने त्यांनी केले. सतीश गंगाधर जगताप हे मागील ३० वर्षापासून मुख्याध्यापक या पदावर कार्यरत असून त्यांचे सामाजिक कार्यात मोलाचे योगदान आहे त्यामुळे त्यांना दिलेल्या उमेदवारीबद्दल शिक्षण क्षेत्रात आनंदाची लाट पसरलेली आहे सर्वतोपरी सहकार्य करण्याचा मानस अनेक संघटना समिती संघ यांनी बोलून दाखविला आहे .

वर्धा येथील मिलींद सालोडकर, प्रदिप गोमासे ,मनोहर बारस्कर ,रामेश्वर लांडे , रविकिरण भोजने ,गजानन पोले , अनिल तडस, विरेंद्र मुडे , मिलींद मुळे , राजेश सोळंकी नागपूर सभेला उपस्थित होते

# बनावट दारूची निर्मिती करणाऱ्या शंकर नगर येथील उच्चभ्रू वस्तीतील कारखान्यावर छापा

**साहसिक वृत्त / ०४ नोव्हेंबर**

**पुसद :** नांदेडच्या राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या भरारी पथकाने यवतमाळच्या स्थानिक गुन्हे शाखेच्या संयुक्त कारवाईने बनावट दारूची निर्मिती करणाऱ्या शंकर नगर येथील उच्चभ्रू वस्तीतील कारखान्यावर छापा टाकला.छाप्यात शेकडो लिटर बनावट दारू,स्पीरीट, कंपनीचे लेबल व बुच बनावटीचे काही रासायनिक द्रव्य असा लाखो रूपयांचा ऐवज जप्त केला आहे.पुसद येथे राहणाऱ्या ' शैलेश ' नामक व्यक्तीस अटक केली आहे. नांदेडच्या भरारी पथकाने पुसद येथील कारवाईमुळे परिसरात खळबळ उडाली आहे.

यवतमाळ येथील स्थानिक गुन्हे शाखा व नांदेडच्या राज्य उत्पादन शुल्क विभागाने संयुक्त कारवाई केली गेली. पुसद येथे बनावट मद्यनिर्मिती होत असल्याची माहिती नांदेडच्या राज्य उत्पादन शुल्क विभागाला हदगाव येथून मिळाली होती.त्या माहितीच्या आधारे दि.२ नोव्हेंबर २०२२ रोजी येथील शंकरनगर येथील एका उच्चभ्रु घरात छापा टाकला.छाप्यात बनावट दारू तयार करून ती दारू नांदेड जिल्ह्यात ठोक पद्धतीने विक्री केला जात होती. त्याची माहिती नांदेडच्या राज्य उत्पादन शुल्क विभागाला कळताच त्यांनी येथील 'शैलेश' नामक व्यक्तीला ताब्यात घेतले.

**रोहडा येथे संपूर्ण महाराष्ट्रात बनावट दारूचा अड्डा**

तालुक्यातील रोहडा येथील पूर्वाश्रमीचा बनावट दारू विक्रेता आरोपी उमेशच्या घराची झडती भरारी पथकाने घेतली. भरारी पथक आल्याची माहिती होतच तो पसार झाल्याचे वृत्त होते. शंकरनगर येथील वस्तीतील घरात चालणाऱ्या कारखान्यावर छापा मारून शेकडो लिटर बनावट दारू,स्पीरीट,विविध कंपन्यांचे लेबल व बुच, बनावट दारू बनविण्याचे काही रासायनिक द्रव्य असा लाखो रूपयांचा ऐवज जप्त केला आहे.येथे राहणाऱ्या शैलेश नामक व्यक्तीला अटक करून नांदेड येथे नेले आहे.

यावेळी राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या अधिकाऱ्यांनी नांदेड जिल्ह्यात कुठे कुठे बनावट दारू पुरविली याची शहानिशा केल्यानंतरच माहिती देणार असल्याचे माध्यमांशी बोलतांना सांगितले. पुसदच्या राज्य उत्पादन शुल्क विभागाचे पोनी प्रमोद खरात यांचेसह इतर कर्मचारी उपस्थित होते.

**पुसद बनले बनावट दारूचे माहेरघर**

यापूर्वी देखील राज्य उत्पादन शुल्काने अनेक वेळा धाडी टाकून त्या जयस्वाल कंपनीवर कारवाई केली गेली. परंतु जयस्वाल कंपनीकडून संबंधित अधिकाऱ्यांना व काही निवडक अधिकारी व लोकांशी संबंध निर्माण करून लाखो रुपये हप्ते पूर्वीत आहेत. त्यामुळेच अशा बनावट दारू विकणाऱ्याचे मनोबल उंचावले आहे.पुसद शहर हे नकली दारू बनविण्याचे माहेरघर झाले असून विदर्भ, मराठवाडयात नकली दारू जोमाने विकली जात आहे.शैलेश नाम व्यक्तीला पकडून त्याची कसून चौकशी केल्याने त्याचे विदर्भ, मराठवाड्यासह संपूर्ण महाराष्ट्रामध्ये कनेक्शन असल्याचे उघड झाले आहे.

# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ क्रीडा संकुलावर व्हॉलीबॉल महिला स्पर्धेचा समारोप

* अखिल भारतीय आंतर विद्यापीठ व्हॉलीबॉल स्पर्धेत चार संघाचा पश्चिम विभागातून सहभाग
* आजच्या सामन्यात प्रथम खुशालदास (राजस्थान), व्दितीय पुणे, तृतीय एल.एन.आय.टी.ई. व चतुर्थ स्थान नागपूरने पटकाविले
* समारोपीय कार्यक्रमात चमूचा चषक देऊन गौरव




**साहसिक वृत्त / ०४ नोव्हेंबर**

**अमरावती :** विद्यापीठ क्रीडा संकुलावर चार दिवस संपन्न झालेल्या पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ महिला व्हॉलीबॉल स्पर्धेत खुशालदास विद्यापीठ प्रथम, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व्दितीय, लक्ष्मीबाई नॅशनल इन्स्टिटूट ऑफ फिजिकल एज्युकेशन ग्वालियर तृतीय आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर संघाने चतुर्थ स्थान प्राप्त केले.

आज सावित्रीबाई फुले विद्यापीठ व खुशालदास विद्यापीठ हनुमानगढ यांच्यात झालेल्या अंतिम सामन्यात खुशालदास विद्यापीठाच्या खेळाडूंची कामगिरी वरचढ राहिली. खुशालदासच्या खेळाडूंनी सुरुवातीपासूनच आक्रमक पवित्रा घेत, पुणे विद्यापीठावर मात केली. स्मॅशिंग, ब्लॉकींग, डिफेन्स, लिफ्टींग खुशालदासच्या खेळाडूंची अप्रतिम होती. पुणे विद्यापीठाने खुशालदासला जोरदार प्रत्युत्तर देण्याचा प्रयत्न केला. चार सेट पर्यंत हा सामना रंगला, यामध्ये ३ सेट खुशालदास विद्यापीठाने, तर एक सेट पुणे संघाने केला. शेवटी खुशालदास विद्यापीठाने ३-१ ने विजय मिळवून स्पर्धेतील प्रथम स्थान पटकाविले. दुस-या स्थानावर पुणे विद्यापीठ संघ राहिला. तृतीय व चतुर्थ स्थानासाठी एल.एन.आय.पी.ई.ग्वालियर व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ यांच्यात झालेल्या सामन्यात ग्वालियरच्या संघाने नागपूर संघावर ३-१ ने सरळ मात करुन विजय मिळविला.

**समारोप व चषक वितरण समारंभ**

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या क्रीडा संकुलावर चार दिवसीय सुरु असलेल्या पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ व्हॉलीबॉल महिला क्रीडा स्पर्धेचा समारोप संपन्न झाला. या समारोपीय कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत पाटील होते, तर प्रमुख अतिथी म्हणून क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाचे माजी सदस्य श्री भाऊसाहेब बेलसरे,विद्यापीठ शिक्षकेत्तर कर्मचारी संघाचे अध्यक्ष श्री अजय देशमुख, क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालक डॉ. अविनाश असनारे, व्हॉलीबॉल असोसिएशन रेफरी बोर्डाचे अध्यक्ष श्री साहेबराव पाटील उपस्थित होते. या सर्वांच्या हस्ते विजेत्या चमूंना चषक देऊन गौरविण्यात आले.

या स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी पाचही जिल्ह्यातील संलग्नीत महाविद्यालयांचे क्रीडा संचालक, गठीत विविध समितींचे सदस्य तसेच शारीरिक व क्रीडा विभागातील कर्मचा-यांनी अथक परिश्रम घेतले. या स्पर्धेच्या सर्व पात्र पंचांनी यशस्वीरित्या व तंत्रशुध्द पध्दतीने सामन्याचा निवाडा केला. पंचांच्या विशेष कामगिरीचे कौतुक केल्या गेले. याप्रसंगी संचालक डॉ. अविनाश असनारे यांनी प्रास्ताविक केले, तर अजय देशमुख यांनी विजयी संघाला अभिनंदन करुन शुभेच्छा दिल्या आणि अध्यक्ष डॉ. श्रीकांत पाटील यांनी खेळामुळे आयुष्य वाढते असा संदेश देऊन विजेत्या संघाचे अभिनंदन केले.

डॉ. विजय पांडे यांनी सूत्रसंचालन केले. तर विजेत्या संघाच्या कप्तान कु. अल्पना तेतरवाल हिने मनोगत व्यक्त करतांना अमरावती विद्यापीठाने उत्कृष्टरित्या केलेल्या आयोजनाबद्दल आभार व्यक्त केले.

# बर्डे प्लॉट भागात नामवंत कंपनीच्या नावावर डॅमेज सिमेंटचा गोरखधंदा जोमात



**साहसिक वृत्त / ०४ नोव्हेंबर**

**खामगाव :** येथील बर्डे प्लॉट भागात कब्रस्तानच्या पाठीमागील एका गोडावूनमध्ये मोठ्या प्रमाणात जळगाव खांदेश येथून व इतर जागेवरून डॅमेज सिमेंटचा साठा जमा करून एका नामांकित कंपनीच्या बॅगमध्ये सिमेंट भरून सर्रास त्याची विक्री करण्याचा गोरखधंदा जोमात सुरू आहे.

यासंदर्भात मिळालेल्या माहितीनुसार, एका मोठ्या कंपनीच्या डॅमेज झालेल्या सिमेंटच्या बॅगा येथील बर्डे प्लॉट भागातील कब्रस्तानच्या पाठीमागील एका गोडावूनमध्ये मोठ्या प्रमाणात साठविण्यात आल्या आहेत. जळगाव खांदेश व शहर परिसरासह जिल्हाभरातून डॅमेज सिमेंट, कालबाह्य सिमेंट यासह पाणी लागून दगड झालेले सिमेंट या गोडावूनमध्ये साठविल्या जात आहे. मशिनव्दारे पावडर करून चाळणीव्दारे छानून घेवून नामवंत कंपनीच्या बॅगामध्ये भरण्यात येत आहेत. सदर बॅग एजंट मार्फत नागरिकांना व मोठ मोठ्या ठेकेदारांना कमी भावात सिमेंट उपलब्ध करून देण्याचे सांगून डॅमेज सिमेंट विक्री करण्याचा प्रकार सद्या सुरू आहे. सदर गोडावूनमध्ये पाहणी केली असता अंबुजा सिमेंटच्या डॅमेज बॅगा मोठ्या प्रमाणात दिसून आल्या. तर अल्ट्राटेक सिमेंट कंपनीच्या नवीन बॅगमध्ये डॅमेज सिमेंट चाळणी लावून भरल्या जात असल्याचे यावेळी पहावयास मिळाले.

सदर प्रकार अवैधपणे सुरू असून अशा प्रकारे सिमेंटची चाळणी करून नवीन बॅगामध्ये सिमेंट भरून विक्री करण्याचा अधिकार नाही मात्र याठिकाणी असा गोरखधंदा सुरू असल्याने नागरीकांची फसवणूक होत असून भविष्यात डॅमेज सिमेंट मुळे मोठी हानी होवू शकते हे नाकारता येत नाही. तरी या गंभीर प्रकाराकडे वरिष्ठ अधिकारी व सिमेंट कंपन्यांनी लक्ष देण्याची गरज आहे.

# जिल्हा परिषदेमध्ये कोट्यवधींच्या पेन्शन रकमेची अफरातफर

**साहसिक वृत्त / ०४ नोव्हेंबर**

**नागपूर :** जिल्हा परिषदेतील कामकाजाला गती देण्यासोबतच चुकीला माफी नाही, या तत्त्वाचा अवलंब करीत मुख्य कार्यकारी अधिकारी योगेश कुंभेजकर यांनी प्रशासनातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना वठणीवर आणल्याचे सांगितले जाते. परंतु आता चक्क त्याच्याच नाकाखाली जि.प.च्या अखत्यारित पंचायत समितीमधील एका कनिष्ठ लिपिक महिलेकडून कोट्यवधींच्या पेन्शनची अफरातफर केल्याचे प्रकरण पुढे आले आहे. संबंधित महिलेने मृत सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे पेन्शन अकाउंटपुढे (बँक खाते) आपल्या कुटुंबीयांसोबतच ओळखीच्या व्यक्तींचे बँक खाते जोडून येणारी पेन्शनची रक्कम ही त्यांच्या खात्यावर वळती करण्याचा कारभार गेल्या अनेक वर्षांपासून चालविल्याचे सांगण्यात येत आहे. नुकतेच हे प्रकरण उघडकीस आल्याने प्रशासनही अवाक् झाले असून, तडकाफडकी संबंधित महिला लिपिके वर निलंबनाची कारवाई करून चौकशी सुरू केली आहे.

जि.प.च्या अखत्यारित पारशिवनी पंचायत समिती अंतर्गत येणाऱ्या शिक्षण विभागातील कनिष्ठ लिपिक महिला नेवारे हे गेल्या अनेक वर्षांपासून येथे कार्यरत आहे. सूत्रांच्या माहितीनुसार त्या महिलेकडे सेवानवृत्त होणाऱ्या शिक्षण विभागातील शिक्षकांचे पेन्शनचे प्रकरण हाताळण्याचे काम असल्याचे सांगण्यात येते. सेवानवृत्त व्यक्तीच्या मृत्यूनंतर त्यांची पेन्शन बंद करणे हे अनिवार्य असते. परंतु सदर महिलेने सेवानवृत्तीनंतर मृत पावलेले कर्मचारी हे हयात असल्याचे दाखवित त्यांच्या नावापुढे आपल्या कुटुंबातील व्यक्ती, ओळखीचे मित्र, नातेवाईक आदींचे बँक खाते जोडून संबंधित व्यक्तींच्या नावाने येणारी रक्कम ही संबंधितांच्या बँक खात्यावर वळती करण्याचा गोरखधंदा सुरू होता. सदर महिलेने यातून कोट्यवधींची माया जमविल्याची चर्चाही जि.प. वतरुळात रंगली आहे.

सूत्रांच्या माहितीनुसार गेल्या अनेक महिन्यांपासून सदर महिला कर्मचारी ही रजेवरही गेली आहे. त्यामुळे तिचे काम दुसऱ्या कर्मचाऱ्याकडे सोपविण्यात आल्यावर हे संपूर्ण बिंब फुटल्याची चर्चा आहे. त्यानंतर पंचायत समिती स्तरावरून गट शिक्षणाधिकाऱ्यांनी केलेल्या प्राथमिक चौकशीच्या आधारे गटविकास अधिकाऱ्यांनी अहवाल सीईओंकडे सादर केला. त्यानुसार हा जि.प.च्या इतिहासातील सर्वात मोठा घोटाळा प्रथमदर्शी उघडकीस आल्याचे सांगण्यात येत आहे.

या गंभीर प्रकरणाची दखल घेत सीईओंनी संबंधित महिला लिपिकेवर तात्काळ निलंबनाची कारवाई केली असून या प्रकरणाच्या चौकशीसाठी वित्त व लेखा अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली शालेय पोषण आहार विभागाचे वित्त अधिकारी आणि सामान्य प्रशासन विभागातील प्रशासन अधिकारी यांचे पथक नेमले आहे. शुक्रवारी हे पथक पारशिवनी येथे जाऊन या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करून पुढील २-३ दिवसांमध्ये सीईओंकडे आपला अहवाल सादर करणार असल्याची माहिती आहे.

# वारकरी साहित्य परिषद जिल्ह्याची बैठक उत्साहात संपन्न



**साहसिक वृत्त / ०४ नोव्हेंबर**

**दारव्हा :** वारकरी साहित्य परिषदेचे अध्यक्ष ह.भ.प. विठ्ठल पाटील काकाजी यांचे मार्गदर्शनाखाली आज दि. ०१/११/२०२२ रोजी वारकरी साहित्य परिषदेची यवतमाळ जिल्हा पदाधिकारी यांची दारव्हा येथे सभा संपन्न झाली. सभेमध्ये वारकरी साहित्य परिषदेच्या कार्याध्यक्षपदी ह.भ.प. देवराव राठोड यांची एकमताने निवड केली. या सभेच्या अध्यक्षस्थानी जिल्हाध्यक्ष ह.भ.प.गुलाबराव राऊत महाराज होते. प्रथमत: कोल्हापूर जिल्ह्यातील पायी कार्तिक वारीत पंढरपूरला जात असताना अपघातात मृत्यू पावलेल्या सात वारकरी बंधूना भावपूर्ण शर्द्धांजली वाहण्यात आली. त्यानंतर मिटींग ला सुरुवात झाली. ११ नोव्हेंबर ला वारकरी साहित्य परिषदेच्या ११ व्या वर्धापनदिनाच्या कार्यक्रमावर विस्तृतपणे चर्चा करण्यात आली.

या प्रसंगी दिलावर नदाफ सर ( राज्य संपर्क प्रमुख व प्रसिद्धी प्रमुख) तसेच ह.भ.प. जितेंद्र कोलप (अकोला व वाशीम जिल्हासंपर्कप्रमुख ) ह.भ.प. संदीप गबाळे सर (सातारा जिल्हा संपर्कप्रमुख) ह.भ.प.दाभोळे सर (नांदेड संपर्क जिल्हाप्रमुख) व यवतमाळ जिल्हा संपर्कप्रमुख श्री.रोपन खटावे यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाली. या कार्यक्रमास ह. भ. प. धनसिंग राठोड, ह.भ.प. भारत घोगरे, हभप. शाम महाराज भानावत, हभप शिवशंकर इंगळे, ह.भ.प. विष्णूपंत महाराज ह.भ.प. डहाळे महाराज, ह.भ.प.शिवशंकर रामकिसन महाराज, ह.भ.प. किशोर कुयटे महाराज, आणि कार्यवाही मंडळी उपस्थित होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अकोला जिल्हा संपर्क प्रमुख जितेंद्र कोलप सर यांनी केले तर सूत्रसंचालन ह.भ.प.शाम भानवत यांनी केले तर सर्वांचे आभार ह.भ.प. देवराव राठोड यांनी मानले.

कार्यक्रमाची सांगता पसायदानाने करण्यात आली. वर्धापन दिन निमित्ताने येत्या ११ नोव्हेंबर रोजी दारव्हा शहरात दिंडी स्पर्धेचे आयोजन केले आहे. तरी स्पर्धकांनी भाग घ्यावे. ही विनंती आहे.

# वणी शहरातील प्रभागात व शाळेच्या आवारात कचरा व घाणीची विल्हेवाट लावा




**साहसिक वृत्त / ०४ नोव्हेंबर**

**वणी :** शहरातील प्रभागात व शाळेच्या आवारात कचरा व घाणीचे साम्राज्य पसरले आहे. शहरात दुर्गंधी पसरली आहे. त्यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे.त्या कचऱ्याची व घाणीची तात्काळ विल्हेवाट लावण्यासाठी राष्ट्रवादी युवक काँग्रेस पक्षाचे युवा शहर अध्यक्ष मनोज वाकटी यांच्या नेतृत्वात आज दिनांक २ नोव्हेंबर रोजी मुख्याधिकारी अभिजित वायकोस वणी यांना निवेदन देण्यात आले.

निवेदनात म्हटले आहे की वणी शहरातील प्रभागात व सार्वजनिक ठिकाणी कचऱ्यामुळे घाणीचे साम्राज्य पसरले आहे. शाळा, महाविद्यालय, ग्रामीण रुग्णालय, महापुरुषांच्या पुतळ्या जवळ कचऱ्याचे ढीग पडले आहेत. त्यामुळे पर्यावरणाचा रास होत आहे.त्यामुळे कचऱ्याची तात्काळ विल्हेवाट लावण्यात यावी,व स्वच्छता अभियान राबवून वणीकर नागरिकांच्या आरोग्याचा विचार करावा.असे निवेदनात नमूद केले आहे.यावेळी तालुका अध्यक्ष हेमंत गावंडे, तालुका उपाध्यक्ष मोबिन शेख, विद्यार्थि शहर अध्यक्ष संदेश तिखट, जिल्हा सरचिटणीस विजय नगराळे, रामकृष्ण वैद्य,यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

# एटीएमची अदलाबदल करून करीत होता फसवणूक

**साहसिक वृत्त / ०४ नोव्हेंबर**

**नागपूर :** बँकेत खाते उघडल्यानंतर नवीन एटीएमचे पिन जनरेट करताना अनेकांना एटीएमवर अडचण जाते. पिन जनरेटची प्रोसेस कळत नसल्यामुळे वारंवार ही प्रोसेस करावी लागते. अशातच, कुणाची मदत मागितली असता मदत करणाराच घात करणार असेल तर विश्वास ठेवावा तरी कुणावर.

अशाच एका आरोपीला कपिलनगर पोलिसांनी अटक केली आहे. पिन जनरेटसाठी कुणी मदत मागितली तर तो एटीएमची अदलाबदल करून तिथून निघून जात होता. त्यानंतर त्या एटीएममधील रक्कम लंपास करीत होता. या आरोपीकडून अशाच प्रकारचे एकूण चार गुन्हे पोलिसांनी उघडकीस आणले आहे. मयूर अनिल कायरकर (वय ३१) असे अटकेतील आरोपीचे नाव आहे. आरोपी मयूरने नुकतेच काही दिवसांपूर्वी फिर्यादी निहार युवराज रामटेके (वय २४, रा. यादवनगर, सुदामनगर) याची फसवणूक केली होती. निहारची आई गंगासागर रामटेके व भाऊ अमित रामटेके यांचे स्टेट बँक ऑफ इंडियाच्या टेकानाका नारी रोड, कपिलनगर शाखेत जॉइंट बँक खाते आहे.

खाते नवीन उघडल्यामुळे त्यांना काही दिवसानंतर बँकेकडून एटीएम कार्ड देण्यात आले. हे एटीएम त्यांच्या घरी आले. नवीन एटीएम असल्यामुळे बँक ऑफ इंडियाच्या एटीएममध्ये पोहोचून पिन जनरेट करणे आवश्यक होते. याकरिता निहार एटीएम कार्ड अँक्टिव्ह करण्यासाठी बँकेत गेला. तो पिन जनरेट करण्याची प्रोसेस करीत असताना त्याला ते जमत नव्हते. यावेळी त्याच्या बाजूला असलेला आरोपी मयूर कायरकर याला निहारने पिन जनरेट करण्याची विनंती केली.

मयूरने यावेळी थातूरमातूर पिन जनरेट करण्याचे सांगत निहारची नजर चुकवून त्याचे एटीएम कार्ड अदलाबदल केले आणि तिथून निघून गेला. त्यानंतर आरोपीने निहारच्या आईच्या खात्यातून ४० हजार रुपयांची रक्कम काढत फसवणूक केली होती.

# रोजंदारी मजुरांचे नगरपंचायतीत समायोजन करण्याची मागणी

**साहसिक वृत्त / ०४ नोव्हेंबर**

**मोहाडी :** नगरपंचायतीमध्ये मागील ग्रामपंचायत काळापासून काम करणाऱ्या १३ मजुरांचा समायोजन करण्यावजी अचानकपणे काढून टाकण्यात आल्याने त्यांच्या भविष्याचा प्रश्न निर्माण झाला असून, या मजुरांना परत कामावर घेण्यात यावे. अन्यथा, नगरपंचायत कार्यालयासमोर संपूर्ण परिवारासह आमरण उपोषण करण्यात येईल, असा इशारा मजुरांनी पत्र परिषदेत दिला आहे.

ग्रामपंचायत काळापासून अंदाजे १५ ते १६ वर्षांपासून १५ मजूर सफाईचे काम करीत आहेत. नगरपंचायत स्थापन झाल्या नंतरसुद्धा आजपर्यंत ते कार्यालया मार्फतच काम करीत होते. परंतु, अचानक १ सप्टेंबरपासून त्यापैकी १३ मजुरांना कामावरून कमी करण्यात येत असल्याचे पत्र काढण्यात आले. १५ मजुरांपैकी १३ मजुरांनाच कामावरून काढण्यात आले. हा आमच्यावर अन्याय आहे. असे या मजुरांचे म्हणणे आहे.

या तेराही मजुरांना घनकचरा कंत्राटदारांकडे रोजंदारीवर वर्ग करण्यात आले आहे. त्यामुळे या कर्मचाऱ्यांनी कंत्राटदाराकडून आपला वेतन घेतलेला नसल्याने त्यांची दिवाळी अंधारात गेली आहे. आम्हाला नगरपंचायततर्फेच वेतन देण्यात यावा, समावेशनासाठी शासनाकडे पाठपुरावा करण्यात यावा, थकीत वेतन पूर्वीप्रमाणे बँकेत जमा करण्यात यावा,



समावेशन होईपर्यंत किमान वेतन लागू करण्यात यावा अन्यथा आम्ही संपूर्ण कुटुंबासह नगरपंचायत कार्यालया समोर आमरण उपोषणावर बसू असा इशारा येथे आयोजित पत्र परिषदेत या मजुरांनी दिला आहे.

यावेळी वामन हेडाऊ, कवळू डोंगरे, दिलीप निमजे, सुनील सोनवाणे, केशवराव निमजे, सुनील कलोसे, ललित उज्जेनवार, विठ्ठल कुंभारे, चंदन वासनिक, सीमा उजैनवार, पुनाबाई कलोसे, मनोहर हेडाऊ, कलीराम मोगरे उपस्थीत होते. त्यामुळे प्रशासन आता कोणती भूमिका घेते याकडे सर्वांचे लक्ष लागून आहे.

# संपादकीय

## आयोगाचा आब!

गुजरात विधानसभेचे मतदान वेळापत्रक जाहीर करताना निवडणूक आयोगाने मोरबी पूल दुर्घटनेत बळी पडलेल्यांस श्रद्धांजली वाहिली, ते योग्यच झाले. निवडणूक आयोगाने तसे करणे आवश्यक होते. याचे कारण गुजरातच्या बरोबरीने मतमोजणी होणाऱ्या हिमाचल प्रदेशातील निवडणुकांबरोबर आयोगाने गुजरातच्या मतदानाचीही तारीख जाहीर केली असती तर मोरबी पूल दुर्घटना घडलीच नसती आणि १३३ वा अधिकांचे प्राण त्यात गेले नसते. निवडणुका जाहीर झाल्या की नव्या प्रकल्पांचे उद्घाटनादी प्रकार करता येत नाहीत. म्हणजे गुजरात विधानसभेच्या निवडणूक तारखाही हिमाचल प्रदेशाच्या बरोबरीने १४ ऑक्टोबरास जाहीर झाल्या असत्या तर अर्ध्यामुर्ध्या मोरबी पुलाचे उद्घाटनच झाले नसते आणि उद्घाटन झाले नसते तर त्या धोकादायक पुलाचा वापरच झाला नसता. म्हणजे मग पुढचा अपघातही झाला नसता. तेव्हा निवडणूक आयोगाने या अपघातातील बळींना श्रद्धांजली वाहिली हे योग्यच केले. या पुलाच्या कोसळण्याने खरे तर गुजरातचे शासन आणि कंत्राटदार यांच्यातील लागेबांधेच उघडयावर आले आणि कंत्राटदार कंपनीच्या कर्त्यासवर्त्यांना दूर ठेवून छोटयामोठयांना अटक केल्याने या लागेबांध्यांवर शिक्कामोर्तबच झाले. या पूल अपघाताने अनेक अश्रापांचे प्राण तर गेलेच, पण त्याचबरोबर विकासाच्या गुजरात प्रारूपाच्या सद्य:स्थितीचा सांगाडाही कोसळला. त्याचबरोबर या सर्व प्रकारामुळे निवडणूक आयोग नामक घटनात्मक यंत्रणेच्या तटस्थतेवरही प्रश्न निर्माण झाले, ते नुकसान वेगळेच. गुजरात आणि हिमाचल प्रदेश विधानसभा निवडणुकांची मतमोजणी एकाच दिवशी, म्हणजे ८ डिसेंबरला, होईल. पण हिमाचल प्रदेश निवडणुकांची घोषणा झाली १४ ऑक्टोबरला आणि गुजरातची मात्र त्यानंतर २० दिवसांनी. या २० दिवसांत पूल अपघाताव्यतिरिक्त काय काय झाले?

हिमाचल प्रदेश निवडणुकांची घोषणा झाल्यानंतर लगेचच पंतप्रधानांनी आपल्या मातृराज्याचा दोन दिवसांचा दौरा केला. या दौऱ्यात एका हवाईतळाचे उद्घाटन झाले, जुनागड येथे ३५८० कोटींच्या प्रकल्पांची घोषणा झाली, राजकोटला ७७१० कोटींचे प्रकल्प जाहीर झाले आणि गुजरातेतील गरिबांसाठी ११०० गृहबांधणी योजनांची घोषणा झाली. खेरीज मोरबी अपघातातील बळींच्या कुटुंबीयांस प्रत्येकी दोन लाख रुपये ही मदत. या अपघातास जबाबदार असणाऱ्या कंपनीच्या धनाढय राजकारण-स्नेही प्रवर्तकांकडून ही रक्कम वसूल होईल किंवा काय हा प्रश्न या वेळी उपस्थित करणे अमानुष ठरेल. पण अपघातास जबाबदार तसेच मोकाट असताना कर भरणाऱ्या जनतेच्या पैशातून या अशा मदती दिल्या जातात हा मुद्दा राहतोच. असो. तेव्हा निवडणूक आयोगास आजच्या पत्रकार परिषदेत या घोषणा दिनांक द्वैताबाबत विचारले असता त्यांनी २०१७ सालच्या निवडणुकांतही असेच घडले होते, याचा दाखला दिला. त्या वेळी हिमाचल प्रदेश निवडणुकांची घोषणा १२ ऑक्टोबरला झाली आणि गुजरातची २५ ऑक्टोबरास. दोन्ही राज्यांची मतमोजणी त्याही वेळी एकाच दिवशी झाली होती. १८ डिसेंबरास ती झाली. त्या वेळी या दोन राज्यांतील निवडणुकांच्या घोषणांत १३ दिवसांचा फरक होता. त्या वेळी काय काय घडले या १३ दिवसांत? गुजरातेतील शेतकऱ्यांस तीन लाख रुपयांपर्यंत व्याजमुक्त कर्जपुरवठयाची घोषणा झाली, विविध पिकांसाठी आकर्षक आधारभूत किमती जाहीर झाल्या, कापूस खरेदीवर बोनस दिला गेला, गुजरात औद्योगिक विकास महामंडळांची डझनभर नवी केंद्रे सूचित झाली, पंतप्रधानांनी स्वत: काही योजनांचा शुभारंभ केला, पाटबंधाऱ्यांसाठी आवश्यक उपकरणांवर वस्तू-सेवा कर माफी, भडोचच्या पाणी प्रश्नासाठी जवळपास साडेचार हजार कोटी रुपयांची योजना, 'आशा' कर्मचाऱ्यांना वेतनवाढ इत्यादी या दोन निवडणूक घोषणांच्या सांदीत केले गेले. ही तफावतीची परंपरा आम्ही यंदाही पाळली असे निवडणूक आयोगाचे म्हणणे असेल तर त्याहीआधी २०१२ साली निवडणुकांच्या तारखा अशा फरकाने जाहीर झाल्या होत्या का, हे पाहणे परंपरावादी आयोगाच्या परीक्षेसाठी उपयुक्त ठरेल. पण २०१२ साली मात्र असे काही झाले नव्हते. हिमाचल आणि गुजरात या दोन्ही राज्यांच्या निवडणुकांची घोषणा तत्कालीन मुख्य निवडणूक आयुक्त व्ही. एस. संपत यांनी एकाच दिवशी, ४ ऑक्टोबरला, केली होती. याचा अर्थ निवडणूक घोषणांच्या दिन-भिन्नतेची परंपरा २०१२ नंतर २०१७ सालच्या निवडणुकांवेळी सुरू झाली. आता २०१२ ते २०१७ या पाच वर्षांत असा काय बदल झाला की निवडणूक आयोगास गुजरात राज्यास निवडणुकांआधी अधिक उसंत मिळावी, असे वाटू लागले? या प्रश्नाचे उत्तर जाणण्यासाठी चाणाक्ष असण्याचीही गरज नाही. तरीही आपले कर्तव्य पालन करणाऱ्या माध्यमकर्मीकडून निवडणूक आयोगास आज हा प्रश्न पुन्हा विचारला गेला. त्यावर गुजरात विधानसभेची मुदत संपण्यासाठी अजूनही बराच अवधी असल्याचे आणि हिमाचलातील वाढत्या थंडीचे कारण मुख्य निवडणूक आयुक्तांनी दिले. सुज्ञ नागरिक या असल्या बहाण्यांवर विश्वास ठेवू शकतात याबाबत आयोगास असलेला आत्मविश्वास तेवढा यातून दिसतो. या आत्मविश्वासास तडा जाणार नाही असा ठाम विश्वास सत्ताधाऱ्यांसही असणार. कारण तो नसता तर पंतप्रधानांच्या कार्यालयात बैठकीसाठी या, अशी आदेशवजा सूचना घटनात्मक यंत्रणेतील अधिकाऱ्यांस उघडपणे कधी केली गेली नसती. गेल्या वर्षी डिसेंबरात मुख्य निवडणूक आयुक्तांस पंतप्रधान कार्यालयात बैठकीसाठी बोलावले गेल्याचे वृत्त 'इंडियन एक्स्प्रेस'ने प्रकाशित केल्यानंतर संबंधित यंत्रणांत एकच खळबळ उडाली. मुख्य निवडणूक आयुक्त हे घटनात्मक पद आहे. म्हणजे ते पशुसंवर्धन, माहिती तंत्रज्ञान, अर्थ, कृषी इत्यादी खात्यांप्रमाणे सरकारचे अंग नाही. याचाच अर्थ आयोगाने सरकारी यंत्रणा, सर्व राजकीय पक्ष इत्यादींस समान अंतरावर दूर ठेवणे आवश्यक आहे. टी. एन. शेषन यांच्या काळात आणि नंतरही काही काळ हे अंतर पाळण्याच्या प्रथेचे पालन आयोगाकडून झाले. त्या काळी पंतप्रधानांच्या कार्यालयाने घटनात्मक पदांवरील व्यक्तीस असे निमंत्रण धाडण्याचे औद्धत्य केले नसते. गेल्या वर्षीही हे वृत्त प्रकाशित झाल्या झाल्या लगेच 'आमचा तसा काही विचार नाही', 'निमंत्रण मुख्य निवडणूक आयुक्तांस नव्हतेच, ते अन्य दोन सदस्यांस होते', 'ती काही औपचारिक चर्चा नव्हती, महत्त्वाच्या विषयावर बोलण्यासाठी येण्याचे अनौपचारिक निमंत्रण होते ते' वगैरे खुलासे झाले. पण निवडणूक आयोगाची 'बुंदसे' गेलेली या हौदभर खुलाशांनी काही परत आली नाही. त्याही आधी २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत दोन सर्वोच्च सत्ताधीशांविरोधात आचारसंहिता भंगाच्या तक्रारींवर निर्णय घेण्यात आयोगाने दाखवलेला निवांतपणा हा चर्चेचा विषय ठरला होता. त्या वेळी हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात गेले. त्यानंतर मात्र आयोगाने याबाबत लगेच निर्णय देण्याची तत्परता दाखवली. या पार्श्वभूमीवर आताच्या निवडणुकांची घोषणा करताना आयोगाने गुजरातला दिलेली अधिक उसंत टीकाविषय ठरत असेल तर ती करणाऱ्यांस दोष देता येणार नाही. न्यायाबाबत असे म्हटले जाते की तो केवळ करून चालत नाही, न्याय केला जाताना दिसणेही तितकेच महत्त्वाचे असते. हे निवडणूक आयोगासही तसेच्या तसे लागू पडावे. केवळ निष्पक्ष, मोकळया इत्यादी वातावरणात निवडणुका घेणे इतकीच आयोगाची जबाबदारी नाही. तर आपण खरोखरच निष्पक्ष आहोत हे दिसेल याची खबरदारी आयोगाने घ्यायला हवी. या अशा 'दिसण्याची' गरजही वाटणार नाही, इतके निर्ढावलेपण राजकीय पक्षांस शोभते. घटनात्मक यंत्रणांनी आपला आब कायम राखायला हवा. आयोगास तर याची अधिकच गरज आहे.

# सृष्टी-दृष्टी : पाळीवांचे आख्यान



'मनुष्यप्राणी' आणि शेलके 'अन्य प्राणी' तसेच मूठभर वनस्पती यांमध्ये जे गाढ अनुजीवीपण उत्क्रांत झाले ते भलतेच लक्षणीय आहे.

वेगवेगळ्या जीवांच्या परस्पर आश्रयातून, सहजीवनातून पृथ्वीवरील जीवप्रकारांमध्ये कमालीचे वैविध्य अवतरले. हे फक्त मनुष्य आणि प्राण्यांमध्येच नाही तर वनस्पतींमध्येही घडले आहे.

जनुके तगण्यासाठी अनेक मार्ग आणि उपाय अवलंबतात. तगण्यासाठी आपसात स्पर्धा करतात हे तर उघडच आहे. परंतु तगण्याचा सोयीस्कर उपाय म्हणून अन्य जीवांच्या जनुकांचा मैत्रीपूर्ण आधार घेतात. उत्क्रांतीच्या वाहत्या समुद्रामध्ये काही उलथापालथ करणारे खळबळजनक प्रवाह आहेत. तगण्याच्या सोयीपोटी स्पर्धेच्या जोडीनेच परस्परांना लाभकारक आघाडी उभारणे हा एक स्वाभाविक 'बनाव' आहे. अनेक जीवन जनुके तो अवलंबताना आढळतात. परस्परांना लाभणारी अनुकंप वृत्ती किंवा अनुजीवीपण (सिम्बायोसिस) आणि सहकार (को-ऑपरेशन) या दोहोंचे भरपूर मासले उत्क्रांतीच्या प्रवाहात आढळतात. या परस्परांना एकाच वेळी लाभकारक असणे हा त्याचा गाभा आहे. त्याखेरीज अनुकंपा उपजत नाही. सहकारी हालचाल घडत नाही. अनुकंपा म्हणजे करुणा आणि एकतर्फी सद्भावना नव्हे!

याची एक मोठी प्रगल्भ वानगी म्हणजे काही जीवांमध्ये डोळयात भरणारे सहजीवन आणि सहवर्तन! उंबर फुलाचे रूप मोठे फसवे आहे. ज्याला आपण फळ समजतो तो खरेतर फळासारखा भासणारा पुष्पगुच्छ असतो. फळाचा मुख्य भाग म्हणजे पुनरुत्पादनासाठी लागणारे बीज! ते फुलात तयार होण्यासाठी परागीभवन झाले पाहिजे. त्यासाठी एक विशिष्ट प्रकारची माशीच कामी येते. कोकिळेने कावळयाच्या घरटयामध्ये अंडी घालण्याचे तर काक-कोकील न्याय असे भारदस्त बारसे झाले आहे. परोपजीवी ऊर्फ बांडगुळे फक्त वनस्पतीत नसतात. आपल्या शरीरात वाढणारे अनेक परोपजीवी जीवाणू आहेत. त्यातले काही तर फार परोपकारी म्हणजे आपल्याला उपकारक आहेत! म्हशींच्या पाठीवर ऐटीत बागडणारे बगळे, शार्कच्या सपाट भालीकपाळी मुक्काम करणारे छोटे मासे, असे भाराभर नमुने सांगता येतील. त्यातदेखील परस्परपूरक आणि यजमान-आश्रित (इंग्रजीत म्युच्युअल आणि कामनसाल) असे पोटभेद आहेतच.

पण या परस्परआश्रयाची पराकाष्ठा म्हणजे पाळीवपणा! त्यात नुसती परस्परपूरकता नाही तर गाढ अनुजीवीपण आहे. 'मनुष्यप्राणी' आणि शेलके 'अन्य प्राणी' तसेच मूठभर वनस्पती यांमध्ये जे गाढ अनुजीवीपण उत्क्रांत झाले ते भलतेच लक्षणीय आहे. या जैविक युतींमुळे पृथ्वीवरील अनेक भूभागांचा चेहरामोहरा पालटला. अनेक नवे जीवजातीप्रकार उपजले तसेच अनेक अगोदरच्या जाती प्रकारांची झपाटयाने पिछेहाट झाली. हे निसर्गक्रमी बदल आजवर अव्याहत चालूच आहेत. अनेक जीवप्रकारांच्या लोकसंख्यांचे संख्यात्मक वाढणे आणि आकसणे बदलले. काहींचा अनोळखी प्रद्रेशात भौगोलिक प्रसार बळावला तर काहींची स्थानिक लोकसंख्यादेखील ओसरली. जीवप्रकारांमध्ये काही नवीनांची भर पडली तर काही भलतेच दुर्मीळ होऊन बसले.

थोडक्यात जीवप्रकारांचे परस्पर प्रमाण कल्पनातीत बदलले. त्याच्या वैविध्याची ठेवण पालटली. विशेषकरून मनुष्यप्राणी आणि त्याच्याशी पाळीव दोस्ती जमू शकणारे जीवप्रकार प्रमाणाने बळावले इतर खालावले. सहजी लक्षात येण्यासारखे उदाहरण बघू. अगोदर जमिनीवर वाढणारी किती तरी गवते होती. मनुष्यप्राण्याच्या हुशारीने त्याला उपयोगी धान्यदार गवतांची पुन:पुन्हा दाणे पेरकाचे आणि विपुल लागवड करण्याचे तंत्र विकसले. तांदूळ वा गहू देणाऱ्या पोएसी आणि ग्रामिनी कुळातल्या वेचक गवतांचा झपाटा वाढला. इतर गवते संख्येने आकसली. याला म्हणतात शेतीचा शोध! या 'गवतां'ना 'माणूस प्राण्या' मुळे आपल्या वंशाचा विस्तार सहजी फोफावता आला. माणूस प्राण्याचाही वंश धान्याच्या लयलुटीने बळावला. पाळीव प्राण्याची प्रजा फोफावली. कुत्रे, बैल, डुक्कर, बदके, कोंबडया संख्येने उदंडले! गवते वृक्षवेलींना निवडक पाळीवपण लाभले आणि इतर वनस्पतींचा वरचष्मा ढेपाळला. हा तर असल्या पाळीव गवतांचा झाडांचा प्राण्यांचा अप्पलपोटा स्वार्थी वांशिक साम्राज्यवाद! तोही माणसाला हाती धरून केलेला! तात्पर्य जीवो जीवस्य जीवनम् इतकेच जीवो जीवस्य प्रसारणम् हे पण तेवढेच खरे!

हे पाळीव उप-आख्यान उत्क्रांती नामक महाकाव्यात कधी आणि कसे उपजले? त्याचा इतिहास उलगडणे तितके सोपे नाही. पहिली अडचण आहे पुराव्यांची. या प्रक्रियेत जे घडले त्याची भूमीत गाडलेली नोंदवही जेवढे सांगते ते स्वभावत: त्रोटक असतेच. प्राण्यांचे त्यांच्या हाडांमुळे विपुल सांगाडे मिळतात.

वनस्पतींचे काय उरणार? फक्त अपघातवशाने त्यांचे क्वचित अश्मरूप मिळतात. क्वचित खोडांचे लाकडी मोठे ढलपे वा तुकडे. प्राणी असोत वा वनस्पती, त्यांना पाळीवपण लाभण्याअगोदरची मूळ रानटी आवृत्त्या कोठे कोठे तग धरून असते. त्यांच्या आधाराने बहुतेक इतिहास उभारला आणि जोखला जातो.

जगभरात सर्वत्र सर्व प्रकारचे प्राणी नव्हते. पूर्वीही नव्हते आजही नाहीत. अगोदर कुठे होते? नंतर का आणि कधी पसरले? त्यांची अशी स्थलांतरे घडविणारी कारणे कोणती? याचाही काही अंशी वेध घेता येतो. पृथ्वीवरील भूगर्भाच्या काही उलथापालथी अतिप्राचीन आहेत तर काही तुलनेने अलीकडच्या आहेत. उदाहरणार्थ भूगर्भी उलथापालथीमुळे अनेक वाळवंटे उद्भवली! तेथील काही प्राणी, झाडझाडोरा नष्ट पावले तर काही स्थलांतरित झाले. नद्यांचे बदलते पात्र, सागरी महासागरी पाण्याची पातकी उंचावणे किंवा ओसरणे. अशा उलथापालथींमुळे जगभरचे हवामान फार हेलकावत आले आहे. त्यामुळे जीवसृष्टीचे भौगोलिक विखुरणे, पसरणे, एका जागी दाटून येणे असे स्थलांतर सतत होत आले आहे. अशा स्थलांतराच्या रेटयामुळे ज्यांना बदलत्या वातावरण आणि पर्यावरणाशी जुळवून घेता आले अशी जीवजनुके तगून राहिली. अन्य काळाच्या पडद्याआड गेली. त्यातल्या काहींचा सुगावा लागतो. अनेकांची वासलात 'नाही चिरा नाही पणती' या वर्गात मोडते. अन्य प्राण्यांप्रमाणेच मनुष्यप्राण्यालाही हे वर्णन लागू आहेच!

जगभर प्राणी आणि मनुष्यप्राणी इतर प्राणी यांचे जे पाळीव सहजीवी नाते आहे त्यात प्राचीन ठोकळमानाने पाळीवपणाचे दोन कालखंड आणि पायऱ्या मानल्या जातात. मूळ 'रानटी' अवस्थेतून माणसाची संगत लाभणारे, रुचणारे पाळीवपण उपजणे. दुसरा टप्पा पाळीव बनलेल्या प्रकारांमध्ये कृत्रिम संकर घडवून नव्या वळणाच्या पाळीव जाती-प्रकारांचा उदय होत राहणारे. कृत्रिम जाणीवपूर्वक संकरात विशिष्ट प्रकाराचे गुणलक्षण पैदासणे हा हेतू असतो. उदा. जास्त बी देणारे रोप, जास्त दूध देणारी गाय, इ. (मराठीत तर 'आखूड शिंगी बहु दुधी, कमी खाणारी पण शेण मात्र जास्त देणारी' अशी सर्वगुणसंपन्नपणाचा उपरोध करणारी 'म्हण'च आहे!) या दोन्ही टप्प्यांची चर्चा डार्विनच्या ग्रंथामध्ये आढळते. पाळीवांच्या कृत्रिम संकराने जे जाणीवपूर्वक निवडले आणि घडवले जाते (आर्टिफिशिअल सिलेक्शन) तसेच काहीसे सृष्टीत अजाणता घडते म्हणून तर त्याने नैसर्गिक निवड किंवा सृष्टीचा वेचकपणा (नॅचरल सिलेक्शन) असा शब्दप्रयोग डार्विनने वापरला. पाळीव प्राण्यांच्या गुण आणि लक्षणांमधे माणसाच्या खटाटोपाचा वाटा आहे. त्याच बरोबरीने पाळीवांच्या लाभामुळे माणसाची जैविक घडणदेखील बदलत उत्क्रांत होत गेली आहे. अगदी सुरुवातीच्या काळात तथाकथित आदिमानव ज्या प्रकारच्या आहारावर गुजराण करीत असे तो आहार आता माणसाच्या शरीराला हाताळता येणार नाही. तसेच माणसाच्या खटाटोपाने पैदासलेल्या पाळीव प्राण्यांना त्यांच्या वन्य प्रकारांप्रमाणे किंवा रानटी पूर्वजांप्रमाणे जगणे मुश्कील जाईल. पाळीवपणामध्ये कोणती जनुके बदलतात? कुठली नवी लक्षणे देणारी जनुके उदय पावतात याचा शोध घेणे हे पाळीवपण संशोधनाला आता कणा बनत चालले आहेत. उदा. पाळीव जनावरांच्या कातडयांचे रंग, त्यावरील केसाळ आच्छादन यांचे रंगरूप ठरविणारी जनुके किंवा प्रथिने ससा, कुत्रा, मांजर, डुक्कर, घोडा, शेळी, कोंबडी अशा विविध प्राण्यांमध्ये एकाच जनुक/ आणि प्रथिन प्रकाराची आढळतात. मेंदूच्या नियंत्रक भागातील पेशीमधील संदेशवाही आरएनएच्या फरकानुसार त्यांच्या वागण्यातील आज्ञाधारकपण आणि हिंस्त्र आक्रमकपण साकारणारे भेद सापडू शकतात, असे समोर आले आहे.

सारांशाने कृत्रिम निवड आणि नैसर्गिक वेचकपणा यांचा मिलाफ उत्क्रांतीच्या यात्रेत जनुकांच्या आणि भोवतालच्या स्थितीशी जुळवून घेण्याचा दबाव यामधून घडत गेलेला आढळतो. जनुकीय विश्लेषणामुळे असे कितीतरी अनपेक्षित पैलू पुढील काळात सापडत राहतील! तसेच जनुकीय तंत्रामुळे नव्या जीवजाती व प्रकारांची पैदास निराळया जोमाने आणि क्षमतेने फोफावणार आहे. त्याला सामोरे जाताना माणसाच्या भू-स्थिर आणि सु-स्थिर उत्क्रांतीमध्ये पाळीवपणाचा मोठा पगडा आहे हे सत्य कदापि डोळयाआड होऊ देऊ नये.

## जेलची हवा ..

रे अटकपूर्व जामीन
चुकण्यां आधी घेता
नसे केला जर गुन्हा
उगाचं कशास भिता

तुरुंगात जावे एकदा
जाणा तिथली कथा
छोट्याखोली राहता
सुटून जातील व्यथा

जेवणदेती जेलमध्ये
ते सरकार अन्नदाता
झकास तुरुंग भत्ता
काम मिळणारं हाता

एकसारखे ते कपडे
सेम सगळ्यां करता
नंबर तेवढा वेगळा
पत्ता ओळखी पुरता

जगाया लागते किती
कळेलं चांगले आता
हाव जिरेल सगळी
हवा तुरूंगाची खाता

सुतासम सरळ होशी
निघेल सारा कडता
बदलून जालं पुरता
जेलच्या बाहेर पडता

**हेमंत मुसरीफ पुणे.**

## * ऋणानुबंध *

नाते कसे बंध कसे
ऋणानुबंध कसे
सुरवंटाचे फूलपांखरू जसे

अचानक भेटता, वदतो ऋणानुबंधच जणू
नभी नजर इश्वरी,
जुळती कर हृदयाशी

काळ वदतो कसे..?
सूख कसले दुख कसले
अशी कशी बर हि परिभाषा
फक्त मर्मबंधी ऋणानुबंधनी अभिलाषा..

नाती.. ना...ते तुटतात जुळतात हि
पण सहवेदना हृदयी वसनी वसतात

जीवन प्रवासातील चढ-उताराचे लांगे-बंधे
जणू ऋणानुबंधनात गुंफलेले नात्याचे रेशमी धागे

ऋणानुबंध कधी साथ नाही सोडत
असंख्य वादळाशी नाते-सबंध तर नाही जडवत
प्रेम भाव विश्व भावनातले अंतर बोले हेच ते क्षऋणानुबंध

**शिल्पाकुलकर्णी पूणे**

## आजचे राशी भविष्य

**मेष :** बुद्धीला पटेल तोच निर्णय घ्या. संमिश्र घटनांचा दिवस. जोडीदाराची उत्तम साथ मिळेल. ओळखीच्या लोकांकडून फायदा होईल. दिवस चांगला जाईल.

**वृषभ :** आरोग्यात सुधारणा संभवते. मुलांच्या उत्कर्षाचा काळ. व्यापाऱ्यांनी अधिक मेहनत घ्यावी. सरकारी कर्मचाऱ्यांचे मतभेद होऊ शकतात. उगाचच वादात अडकू नका.

**मिथुन :** नवीन संधी दार ठोठावेल. उगाच स्वत:ला एखाद्या वादात अडकवू नका. लाभदायक दिवस. शेअर बाजारातील गुंतवणूक फायदेशीर ठरेल. जुगारातून लाभ संभवतो.

**कर्क :** अधिकाराचा अति वापर टाळावा. दिवसभर कामात गर्क राहाल. कौटुंबिक जबाबदारीत वाढ होईल. आत्ममग्न राहाल. वैचारिक दिशा बदलून पहावी.

**सिंह :** कौटुंबिक सौख्याचा समतोल राखावा. कलाक्षेत्राबाबत अपेक्षित वार्ता मिळतील. हित शत्रू त्रास देण्याचा प्रयत्न करतील. मनातील अनामिक भीती काढून टाकावी. अनोळखी व्यक्तींशी व्यवहार टाळावेत.

**कन्या :** कोणतीही गुंतवणूक सावधगिरीनेच करावी. आवक आणि जावक यांचा मेळ घालावा. वाहन चालवताना काळजी घ्यावी. रागावर नियंत्रण ठेवा. समोरील गोष्टीत आनंद शोधावा.

**तूळ :** इतरांना सल्ले द्यायला जाल. कामाची दिवसभर धांदल राहील. वरिष्ठांकडून कामाचे कौतुक केले जाईल. एखादी घटना मन विचलीत करू शकते. इच्छा नसताना सुद्धा प्रवास करावा लागू शकतो.

**वृश्चिक :** लोकांवर अवलंबून राहू नका. पुढे ढकललेले काम हाती घ्या. मानसिक संतुलन राखावे. मनातील निराशाजनक विचार काढून टाकावेत. उगाचच लपवाछपवी करायला जाऊ नये.

**धनू :** दूरदृष्टी ठेवून विचार करावा. योग्य नियोजनावर भर द्यावा. शक्यतो आपल्या मुद्यावर ठाम रहा. कुटुंबातील सदस्यांची साथ लाभेल. व्यवहारात निष्काळजीपणा करू नका.

**मकर :** जोडीदाराच्या साथीने मनोकामना पूर्ण करा. व्यवसायात अति विश्वास ठेऊ नका. जुन्या गोष्टी उगाळत बसू नका. कामातील उत्साह वाढीस लागेल. दिवस धावपळीत जाईल.

**कुंभ :** फसवणुकीपासून सावध राहावे. आरोग्याकडे दुर्लक्ष करू नये. वडीलधाऱ्यांचा योग्य तो मान राखावा. आवडीच्या वस्तु खरेदी कराल. मानसिक शांतता जपावी.

**मीन :** कामात मित्रांचा सल्ला घ्याल. अति मसालेदार पदार्थ खाणे टाळावे. वैचारिक समतोल साधावा. उत्साहाने कामे हाती घ्यावीत. भडक विचार मांडू नका.

## हिवाळ्यात होणाऱ्या आजारांपासून वाचण्यासाठी मदत करतात 'हे' पदार्थ; लगेच करा आहारात समावेश

हिवाळ्यात होणाऱ्या हवामान बदलामुळे अनेक आजार बळावतात, यापासून बचाव करण्यासाठी कोणते पदार्थ मदत करतात जाणून घ्या.



हिवाळ्यातील धुके, वातावरणात होणारे बदल, प्रदूषण या कारणांमुळे तब्येतीची विशेष काळजी घेणे गरजेचे असते. वातावरणातील या बदलामुळे दमा किंवा श्वासाशी निगडित आजार असणाऱ्यांना अधिक काळजी घेण्याची गरज असते, इतकेच नाही तर अशा समस्या नसणाऱ्यांना देखील नव्याने काही समस्या उद्भवण्याची शक्यता असते. अशावेळी काही पदार्थांचा रोजच्या आहारात समावेश केल्यास ते हिवाळ्यात होणाऱ्या आजारांपासून वाचण्यासाठी मदत करू शकतात, कोणते आहेत ते पदार्थ जाणून घ्या.

**आले :**

आल्यामध्ये अँटी-इन्फ्लॉमेंटरी गुणधर्म आढळतात, ज्यामुळे रोगप्रतिकारक शक्ती वाढण्यास मदत होते. बॅक्टेरिया, व्हायरस यांमुळे हिवाळ्यात बाळावणाऱ्या आजरांपासून वाचण्यासाठी आले नक्कीच फायदेशीर ठरू शकते.

**बदाम :**

बदामामध्ये मॅग्नेशियम, प्रोटीन, झिंक असे अनेक गुणधर्म आढळतात. तसेच यामध्ये विटामिन ई मुबलक प्रमाणात आढळते. विटामिन ई रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्यासाठी आणि व्हायरस, बॅक्टेरियांपासून संरक्षण करण्यासाठी ओळखले जाते. त्यामुळे हिवाळ्यात दररोज बदाम खाणे आरोग्यासाठी फायदेशीर ठरेल.

**तुळशीची पाने :**

तुळशीची पाने देखील रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्यासाठी फायदेशीर मानली जातात. तसेच तुळशीच्या पाने श्वसन संस्था आणि फुफ्फुसांच्या आरोग्यासाठी फायदेशीर मानली जाते.

**हळद :**

हळद हे प्रत्येक स्वयंपाक घरात उपस्थित असणारा गुणकारी पदार्थ आहे. यामध्ये अँटीइन्फ्लामेंटरी आणि अँटिऑक्सिडंट गुणधर्म आढळतात. हळदीचा रोजच्या जेवणात समावेश केल्यास रोगप्रतिकारक शक्ती वाढण्यास मदत होते. यासह हिवाळ्यात सतत घशाची खवखव होते, यावर देखील हळद गुणकारी औषध मानले जाते.

**लसूण :**

लसूण विटामिन सी, विटामिन बी, झिंक, फोलेट यांचे उत्तम स्त्रोत मानले जाते. लसणामध्ये अँटिव्हायरल, अ ॅ ि ट ब ॅ ा -ट ा ि र य ा ल , अँटीइंफ्लॉमेंटरी गुणधर्म आढळतात. रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्यासोबतच सर्दी, खोकला अशा हिवाळ्यात सतत होणाऱ्या त्रासावर लसूण गुणकारी औषध मानले जाते. त्यामुळे हिवाळ्यात लसणाचा आहारात समावेश करणे फायदेशीर ठरेल.

## तोंडाचे आरोग्य जपण्यासाठी..



फ्लॉसिंग म्हणजे दातांमध्ये अडकलेले अन्नकण काढून टाकण्याची प्रक्रिया. तोंडाच्या स्वच्छतेत फ्लॉसिंगचं खूप महत्त्व आहे. पण अनेकजण या प्रकियेला फारसं महत्त्व देत नाहीत. मात्र दात घासण्याप्रमाणेच सकाळी आणि रात्री नियमित फ्लॉसिंग करायला हवं. खाताना दातांमधल्या फटींमध्ये छोटे छोटे अन्नकण अडकून बसतात. यामुळे हरड्या सुजणं तसंच इतरही दंतविकार उद्भवतात. नियमित फ्लॉसिंग न करणाऱ्यांना हिरड्यांचे विकार जडू शकतात. याकडे दुर्लक्ष केलं तर वारंवार रूट कॅनालचे उपचार करून घ्यावे लागतात. अनेकदा दात काढायची वेळ येऊ शकते. त्यामुळे तोंडाच्या आरोग्यासाठी नियमित फ्लॉसिंग करायला हवं.

# सायंकाळी होणारा नियोजित बालविवाह दिवसा थांबविला

**मुलीचे वय १७ वर्षे ४ महिने तर मुलाचे वय २० वर्षे ३ महिने : जिल्हा बाल संरक्षण कक्ष गडचिरोली यांची कार्यवाही**

**साहसिक वृत्त/ ०४ नोव्हेंबर**

**गडचिरोली :** जिल्हयातील मूलचेरा तालुक्यात एक बालविवाह होत असल्याची गोपनीय माहिती मिळाली होती.त्यानुसार लगेच जिल्हा बाल संरक्षण टीम गडचिरोली यांनी सदर बालविवाह रोखण्याकरीता विवाहस्थळ गाव गाठले व बालक १८ वषार्खालील असल्याची खात्री करून सर्व माहितीची शहानिशा झाल्यानंतर गावातील सरपंच पवन मंडल, नागेन सेन पोलीस पाटिल, अंगणवाडी सेविका दिपू सरकार आणि अमियो सेन यांच्या समक्ष मुलाचे घर गाठले. व वधू वर यांच्या आई वडील व उपस्थित नातेवाईकांना बालविवाह केल्यास होणाऱ्या दुष्परिणामाबाबत माहिती देऊन वधुचे १८ वर्ष व वराचे २१ वर्ष पूर्ण झाल्याशिवाय त्यांचे लग्न लावून देणार नाही असा जबाब नोंदविण्यात आला.पोलीस पाटील,सरपंच,अंगणवाडी सेविका यांच्या उपस्थितीत वर पक्ष व वधू पक्ष यांचेकडून हमी पत्र लिहून घेतले व बालिकेचे समुपदेशन करण्यात आले.

सदर कार्यवाही जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी प्रकाश भांदककर यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा बाल संरक्षण अधिकारी अविनाश गुरनुले, बाल संरक्षण अधिकारी प्रियंका आसुटकर, सामाजिक कार्यकर्ता जयंत जथाडे, संरक्षण अधिकारी मुलचेरा महेंद्र मार्गोनवार, तनोज ढवंगाये सामाजिक कार्यकर्ते, क्षेत्र कार्यकर्ता रवींद्र बंडावार,लेखापाल पूजा धमाले यांनी कार्यवाही केली. सदर बालविवाह थांबविण्यासाठी प्रभारी गट विकास अधिकारी मूलचेरा मनोहर रामटेके,व बाल विकास प्रकल्प अधिकारी विनोद हाटकर, यांचे विशेष सहकार्य लाभले.

अशाप्रकारे जिल्ह्यात कुठेही बालविवाह होत असल्यास जिल्हा बाल संरक्षण कक्ष येथे व चाइल्ड लाईन टोल फ्री १०९८ या क्रमांक वर बाल विवाह बाबत संपर्क साधावे माहिती सांगणाऱ्याचे नाव गोपनीय ठेवण्यात येईल.

एकीकडे देश विज्ञान युगात मोठ्या गतीने प्रगती करत आहे मात्र गडचिरोली सारख्या आदिवासी दुर्गम भागात अद्यापही बालविवाह होत असल्याचे समजून येते अशा परिस्थितीत जिल्हा बाल संरक्षण कक्ष गडचिरोली यांनी अति सतर्क सतर्क राहून राहण्याची गरज आहे सदर कारवाईमुळे जिल्ह्यातील इतर ग्रामीण भागात नियोजित बालविवाह करणाऱ्यांना धास्ती बसलेली आहे.

जिल्ह्यात होत असलेल्या बालविवाह बाबतची माहिती दिलेल्या टोल फ्री नंबर १०९८ वर द्यावी असे आवाहन यावेळी बाल संरक्षण कक्ष गडचिरोली यांच्याकडून करण्यात आलेले आहे संबंधित माहिती देणाऱ्याचे नाव हे पूर्णपणे गोपनीय ठेवण्यात येईल.

# गुजरात तुपाशी, महाराष्ट्र उपाशी; गुजरातला गेलेले प्रकल्प परत आणा

**हिंगणघाट राष्ट्रवादी युवक कॉंग्रेसच्या वतीने केला निषेध**



**साहसिक वृत्त/ ०४ नोव्हेंबर**

**हिंगणघाट :** वेदांत प्रकल्प, एअर बस प्रकल्प व महाराष्ट्रातील इतर मोठे प्रकल्प गुजरात राज्यात जात आहे ते थांबवण्याबाबत नगरसेवक सौरभ तिमांडे यांच्या नेतृत्वात राष्ट्रवादी युवक कॉंग्रेसच्या वतीने निषेध व्यक्त करत महाराष्ट्रातून गुजरातला गेलेले प्रकल्प परत आणा याबाबत निवेदन देण्यात आले.

दीड लाख कोटी रुपयांचे मोठ मोठे वेदांत व एअर बस प्रकल्प महाराष्ट्र राज्यातून गुजरात राज्यात नेणे हे योग्य नाही. पुणे स्थित वेदांत प्रकल्प सेमीकंडक्टर प्लाट महाराष्ट्रातून गुजरात राज्यात वळविला आणि त्याच बरोबर थोडया दिवसानंतर एअर बस प्रकल्प हा हेतुपुरस्पर गुजरात राज्यात वळविणे हा महाराष्ट्र राज्याची अस्मिता संपविण्याचा कट आहे.

महाराष्ट्रातील बेरोजगार युवकांना उद्योगामध्ये काम न देता बेरोजगारी वाढविण्याचा संकल्प केंद्र सरकारने केला आहे. ही बाब लज्जास्पद आहे. महाराष्ट्रातील प्रकल्प राज्या बाहेर जाणे कितपत योग्य आहे? महाराष्ट्रातील मोठ मोठे प्रकल्प गुजरात राज्यात नेणे हे केंद्र सरकारने ठरवावे. भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी साहेबांनी देशातील उद्योगिक धोरणात सर्व राज्यांना समान वागणूक द्यायला हवी.

महाराष्ट्रातील उद्योग क्षेत्रातील मोठे प्रकल्प गुजरात राज्यात नेऊन महाराष्ट्राची अस्मिता कमी करणे, ही बाब योग्य नाही या बाबत हिंगणघाट राष्ट्रवादी युवक कॉंग्रेसच्या वतीनेविरोध करून निषेध व्यक्त करण्यात आला. त्यावेळी नगरसेवक सौरभ तिमांडे, संतोषराव तिमांडे, दिवाकर डफ, गौरव घोडे, अमोल त्रिपाठी, युवराज मा ऊसकर रितू मोघे हर्षल तपासे पवन काकडे ओम सावरकर आदर्श त्रिवेदी इत्यादी उपस्थित होते.

# दादाराव मून यांचा आचार्य पदवीने सन्मान



**साहसिक वृत्त/ ०४ नोव्हेंबर**

**देवळी :** येथिल स्थानिक रहिवासी तसेच जागुती व्यसन मुक्ती केद्राचे संस्थापक संचालक दादाराव मून यांना नुकतीच कॅलिफोनिया विद्यापीठाने आचार्य पदविने सन्मानित केले.

त्यांना लोकप्रबोधनकार शाहीर वामनदादा कर्डक यांचा प्रबोधनाचा दुष्टीकोन या संशोधन प्रबंधनावर आंतरराष्ट्रीय मानव्य विघा , शाती आणि आरोग्य साधना या विषयावर प्रबध सादर केला अमेरीकेतील कॅलिफोनिया विद्यापीठाने त्यांच्या लिखानाचे तसेच सामाजिक कायार्ची दखल घेऊन विद्यापीठाने सर्व च्च पदावि पी. एच.डी. देऊन सन्मानित केले दादाराव मून हे मागील तीस वषार्पासुन व्यसन मुक्ती साठी कार्य करीत आहे.

कॅलिफोनिया विद्यापीठाने भारतातील विद्यार्थी साठी दिक्षांत समारंभ मध्यप्रदेश येथिल इंदोर. येथे दि. ३० ऑक्टोबर २२ ला आयोजित कार्यक्रमात पदवि प्रदान करण्यात आली या संशोधन कायासाठी क ल्यान मुंबई केद्राचे डॉ. माधव गवळी यांचे मार्गदर्शन लाभले तसेच यांच्या संशोधन कायार्चे केद्र वर्धा होते , रिसर्च अकॅडमी चे प्रमुख डॉ. सुभाष खंडारे यांनी गाईड म्हणून मार्गदर्शन केले.

वयाच्या ७५ व्या वर्षी आचार्य पदविने सम्मानित झाल्यामुळे प्रा. आत्माराम लोंखडे अँड मंगेश राऊत माजी नगराध्यक्ष गौतम पोपटकर श्रीकांत चाफले साईर्शद्धा पंतसस्था बॅकेचे सचिव हर्ष भद्र धर्मा प्रज्ञा मून पत्रकार गणेश शेंडे योगेश कांबळे तसेच व्यसनातून मुक्त झालेल्या अनेक कुटुबियांनी डॉ दादाराव मुन यांचे अभिनंदन केले.

# लाल बहादूर शास्त्री वॉर्डात दोन भावंडाना मारहाण

**साहसिक वृत्त/ ०४ नोव्हेंबर**

**भंडारा :** घरात शिरुन दोन भावंडाना चार जणांनी मारहाण करुन जखमी केल्याची घटना शहरातील लाल बहादूर शास्त्री वार्डा शुक्रवारी येथे घडली.

लालबहादूर शास्त्री वॉर्डातील रहिवाशी उमेश बाबुराव चामट (२६) हा आपल्या भावासह घरी होता तेव्हा राहुल दिलीप कुथे (२८), मनिष हटवार (२४) दोघेही रा.सहकार नगर, भंडारा, अजय शेंडे (२५) रा.किसान चौक भंडारा हे घरी आले. उमेश व त्याच्या भावाला शिवीगाळ करुन कॉलर पकडून घराच्या बाहेर ओढत घरासमोरील रस्त्यावर आणून तिघांनी मारहाण केली. राहुल दिलीप कुथे याने त्याचे वडिलांकडून उधार घेतलेले पैसे परत कर असे म्हणून मारहाण केली.

मनिष हटवार याने चाकूने उमेश याच्या भावाच्या डोक्यावर, ओठावर मारुन गंभीर जखमी केले. काहीवेळानंतर शुभम गभने रा.शुक्रवारी भंडारा हा तिथे आला व माझ्या मित्राला का मारहाण केला असे म्हणून त्याने सुद्धा उमेश व त्याच्या भावाला मारहाण केली. त्यानंतर चारही जण घटनास्थळावरुन पळून गेले. उमेश चामट यांच्या तक्रारीवरुन भंडारा पोलिस स्टेशन येथे गुन्हा नोंद केला.

पोलिसांनी घटनेचे गांभीर्य ओळखून तपास करुन चारही आरोपींना अटक केली. पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक रहाटे हे करीत आहेत.

# सर्वसामान्यांच्या हितासाठी कार्य करावे - मंत्री संजय राठोड

**स्वातंत्र्याचा अमृत महोत्सवी वर्षानिमित्त नियुक्ती आदेश वाटप कार्यक्रम**

**साहसिक वृत्त/ ०४ नोव्हेंबर**

**अमरावती :** स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त ७५ हजार युवकांना रोजगार देण्याचा राज्य शासनाने संकल्प केला आहे. शासकीय नोकरीचे स्वप्न बाळगणाऱ्या व स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या तरुणांचे या उपक्रमाच्या माध्यमातून स्वप्न साकार होत आहे. या माध्यमातून सर्वसामान्यांच्या सेवेची संधी उमेदवारांना प्राप्त होत आहे. सर्वसामान्य माणूस हा केंद्रबिंदू मानून राज्याला प्रगतीपथावर नेण्यासाठी संघटितपणे कार्य करूया, असे प्रतिपादन अन्न व औषध प्रशासन मंत्री संजय राठोड यांनी आज येथे केले.

स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त नियुक्ती आदेशाचा वाटप कार्यक्रम नियोजनभवनात झाला. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी मंत्री राठोड यांच्या हस्ते प्रातिनिधीक स्वरुपात अमरावती विभागातील तीसजणांना तसेच एकूण १०९ उमेदवारांना नियुक्ती आदेशांचे वितरण करण्यात आले. राज्यात सर्व विभागीय ठिकाणी हा कार्यक्रम झाला. यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीतील मुंबई येथील कार्यक्रमाचे थेट प्रसारणही करण्यात आले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या शुभेच्छापर संदेशाची चित्रफीत यावेळी दाखविण्यात आली. विभागीय आयुक्त डॉ. दिलीप पांढरपट्टे, जिल्हाधिकारी पवनीत कौर, प्रादेशिक वनसंरक्षक जी. के. अनारसे, महावितरणच्या मुख्य अभियंता पुष्पा चव्हाण, पारेषण मुख्य अभियंता जयंत विखे, महावितरण अकोला परिक्षेत्राचे मुख्य अभियंता पवनकुमार कचोट, सहायक महाव्यवस्थापक सुर्यकांत फलटणकर, मनीष भोपळे, परिवहन महामंडळाचे विभागीय नियंत्रक निलेश बेलसरे, उपायुक्त संजय पवार, निवासी उपजिल्हाधिकारी विवेक घोडके आदी उपस्थित होते. राठोड म्हणाले की, कोरोनाकाळात उद्योग, व्यवसाय बंद असल्यामुळे अनेकांच्या नोकऱ्या गेल्या. हे लक्षात घेऊन राज्य शासनाने भरती प्रक्रिया सुरू करून युवकांसाठी सुवर्ण संधी



निर्माण केली आहे. राज्याच्या हिताचे ७०० निर्णय शासनाने घेतले.

रिक्त पदांमुळे यंत्रणेवर ताण येतो. क्षेत्रीय स्तरावर काम करणारे कर्मचारी नसतील तर एकालाच अनेक प्रभार सांभाळावे लागतात. त्यामुळे कामे प्रलंबित राहतात. त्यामुळे सर्व विभागांत भरती प्रक्रियेला गती देण्यात आली आहे. विभागीय आयुक्त डॉ. पांढरपट्टे म्हणाले की, या उपक्रमाद्वारे तरुणांना मोठ्या प्रमाणावर नोकऱ्या उपलब्ध होणार आहेत. शुभारंभाच्या दिवशी राज्यात २ हजार युवकांना एकाचवेळी नियुक्तीपत्रे दिली जात आहे.यावेळी महावितरणमध्ये नियुक्त ९५, महापारेषणमध्ये एक व परिवहन महामंडळात नियुक्त १३ अशा एकूण १०९ उमेदवारांना नियुक्ती आदेशांचे मान्यवरांच्या हस्ते वाटप करण्यात आले. कार्यक्रमाला विविध मान्यवर उपस्थित होते.

# करमटोलातील निकुरे कुटुंबाला शिवसेनेचा आधार!

**साहसिक वृत्त/ ०४ नोव्हेंबर**

**गडचिरोली :** तालुक्यातील मौशिखांब मुरमाडी जिप क्षेत्रातील करमटोला परिसरात नरभक्षी वाघाने शेतकरी प्रभाकर निकुरे यांचेवर हल्ला चढवून ठार केले होते. या घटनेमुळे निकुरे कुटूंबियांवर मोठा आघात कोसळले. ही बाब लक्षात घेत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे सहसंपर्क प्रमुख अरविंद कातट्रवार यांनी निकुर कुटूंबियांचे सांत्वन करीत कुटूंबाला आर्थिक मदत केली. तसेच वनविभागाद्वारे वाघाचा तत्काळ बंदोबस्त न केल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही कातट्रवार यांनी यावेळी दिला.

तालुक्यातील अमिर्झा परिसरात गेल्या वर्षभरापासून नरभक्षी वाघाचा धुमाकूळ कायम असून व्याघ्रबळीच्या घटनात वाढ होत आहे. या नरभक्षी वाघाने वर्षभरात अनेक महिला, शेतकरी, नागरीकांचे बळी घेतले आहेत. एकट्या दिभना गावातील चार नागरिकांचे वाघाच्या हल्ल्यात बळी गेले आहेत. व्याघ्रबळीच्या घटना वारंवार घडत असतांना वनविभागाद्वारे सदर नरभक्षीचा बंदोबस्त केला नाही. अशातच २४ ऑक्टोबर रोजी करमटोला येथील शेतकरी प्रभाकर निकुरे जनावरे चराईसाठी गावालगतच्या जंगल परिसरात गेले असता नरभक्षक वाघाने त्यांच्यावर हल्ला करून ठार केले. या घटनेची माहिती शिवसैनिकांनी शिवसेनेचे सहसंपर्क प्रमुख अरविंद कातट्रवार यांना दिली. जनसेवेच्या कार्यात सदैव अग्रेसर असलेले कातट्रवार यांनी सामाजिक बांधीलकी जोपासत वाघाचा बळी ठरलेल्या प्रभाकर निकुरे यांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत दिली. तसेच शासनाकडून देण्यात येणारी आर्थिक मदत मिळवून देण्याचे आश?वासन यावेळी दिले. याप्रसंगी उपतालुका प्रमुख यादव लोहबरे, नवनाथ ऊके, संदीप अलबनकर, प्रशांत ठाकुर, संदीप भुरसे, संजय बोबाटे, सचिन निलेकर, मुकेश गुरनुले, सूरज उइके, अमित बानबले, आनंदराव चुधरी, दिलीप चनेकर, ईश्वर लाजुरकर, पूंजीराम चुधरी, भगवान चनेकर, राहुल खेवले, तानाबा दजगये, नानाजी काळबंधे, राहुल सोरते, स्वप्निल खांडरे, अंबादास मुनघाते,धनेश्वर सुरकर, धानेश्वर फुकेट, सूरज कोलते, निकेश लोहबरे, सूरज शेंडे,विलास देशमुख, सोनू ठाकरे,रविंद्र मिसार,निरंजन लोहबरे, जगन चापडे,मोतीराम भुरसे,गोपाल मागरवाढर, रूमााना भांडेकर,विलास नैताम, चंद्रभान कोमलवार आदींसह शिवसैनिक व ग्रामस्थ उपस्थित होते.

वाघाच्या घटेनमुळे करमटोला परिसरातील अनेक गावातील नागरिकांमध्ये भितीचे वातावरण असून याचा परिणाम शेती कामावर झाला आहे. गावालगतच्या जंगल परिसरात जनावरे चराईसाठी नेल्यास वाघाच्या हल्ल्याच्या घटना वाढत आहेत. यामुळे जनावरे कुठे चारावी, त्यांचे संगोपण कसे करावे, त्याचबरोबर शेतीची मशागत न केल्यास कुटुंबाचा उदरनिर्वाह कसा करावा असा अनेक प्रश्न नागरिकांसमोर उभे ठाकले आहेत. गेल्या दोन वर्षात वाघाच्या हल्ल्यात गडचिरोली तालुक्यात २३ नागरिकांचे बळी गेले आहेत. व्याघ्रबळीच्या घटना वाढल्याने नागरिकांमध्ये भितीचे वातावरण पसरले आहे. तसेच शेती कामावरही याचा परिणाम पडला आहे. तालुक्यातील अमिर्झा, मौशीखांब, मुरमाडी क्षेत्रातील गाव परिसरात वाघांचा संचार आहे. याच भागात सवार्धीक नागरिकांचे बळी गेले आहेत. यात राजगाटा येथील ३, गोगाव २, शिवणी ३, महादवाडी १, कुहाडी १, भिकारमौशी १, कळमटोला २ दिभना २ जेप्रा २, चुरचुरा माल ३, बोदली १, इंदिरानगर येथील एका नागरिकाचा समावेश आहे.

यासोबतच अनेक पाळीव प्राण्यांचा फडशा पाडला आहे. व्याघ्रबळीच्या घटना वाढल्याने या परिसरातील नागरीक दहशतीत जीवन जगत आहेत. गावालगतच्या जंगलात वाघाचा संचार असल्याने नागरीक शेतावरही जाण्यास धजावत नसल्याचे चित्र आहे. यामुळे धान पिकांचे नुकसान होण्याची शक्यता आहे. त्यामुळे वनविभागाने तत्काळ वाघाचा बंदोबस्त करावा, या मागणीला घेऊन १० नोव्हेंबर रोजी मुख्य वनसंरक्षक कार्यालयावर मोर्चा काढण्याचा इशारा अरविंद कातट्रवार यांनी दिला आहे.

# सोने, चांदीचे दागिने चोरणाऱ्या आरोपीला अटक

**तुमसर पोलिसांची कारवाई : चोरीला गेलेला मुद्देमाल जप्त**



**साहसिक वृत्त/ ०४ नोव्हेंबर**

**भंडारा :** तुमसर येथील कुंभारे नगर येथे कुटूंबासह बाहेर गावी गेल्याचे व घराचा दरवाजा उघडा असल्याचे पाहून आरोपीने घरात प्रवेश करुन घरातील कपाटातील सोन्या, चांदीचे दागिने लंपास केल्याची घटना घडली त्या घटनेचा तपास तुमसर पोलिसांनी करुन एका आरोपीला अटक करुन चोरी गेलेला सर्व मुद्देमाल जप्त केला. धम्मशाली राजेश चौधरी (३५) रा.जरीपटका नागपूर असे आरोपीचे नाव आहे.

तुमसर येथील कुंभारे नगरातील विक्रांत देवदास बन्सोड (३३) हे आपल्या कुटूंबासह बाहेर गावी गेले होते. अज्ञात चोरट्याने रात्रीच्या वेळी सुना मौका पाहुन घराचे दार उघडे पाहुन घरात प्रवेश केला. घरातील बेडरुमधील लोखंडी कपाटातील सोन्याचे दागिने व रोख करुन चोरुन नेली. याघटनेची तक्रार विक्रांत बन्सोड यांनी तुमसर पोलिस स्टेशनला दिली.

या तक्रारीची गंभीर दखल घेत पोलिस अधीक्षक लोहित मतानी यांनी तुमसर उपविभागीय पोलिस अधिकारी निती पुडी रस्मीताराव यांच्याशी घटनेबाबत सविस्तर चौकशी केली व दिलेल्या निर्देशावरुन तुमसर पोलिस स्टेशनचे ठाणेदार पोलिस निरीक्षक यांनी पथक तयार केले. चोरट्याचा मागावर लागले. तपास करित असतांना तुमसर पोलिसांनी एक संशयीत धम्मशाली राजेश चौधरी (३५) रा.जरीपटका नागपूर याला ताब्यात घेतले. त्याला सविस्तर विचारपुस केली असता त्याने चोरी केल्याचे कबुल केले. आरोपी धम्मशाली चौधरी याचे कडून चोरी गेलेला सर्व मुद्देमाल व रोख पोलिसांनी जप्त करुन आरोपीला अटक केली. सदरची कार्यवाही पोलिस अधीक्षक लोहित मतानी, अप्पर पोलिस अधीक्षक अनिकेत भारती यांचे मार्गदर्शनात तुमसर पोलिस स्टेशनचे ठाणेदार नितीन चिंचोळकर, पोलिस उपनिरीक्षक विजयसिंग गोमलाडू, सहायक फौजदार ओमप्रकाश चिचखेडे यांनी केली आहे.

# जखमीला रुग्णालयात नेताना वाटेतच सोडले प्राण



**साहसिक वृत्त/ ०४ नोव्हेंबर**

**नेरी :** चिमूर तालुक्यातील नेरी-सिरपूर मार्गावर बुधवारी दुपारी ४ वाजताच्या सुमारास बस आणि दुचाकी यांची समोरासमोर धडक होऊन दुर्दैवी अपघात झाला. यात दुचाकी चालक बस ला जाऊन आढळून जखमी झाला होता त्याला उपचाराकरिता चिमूर उपजिल्हा रुग्णालय नेले असता प्रकृती चिंताजनक असल्याने त्याला नागपूर येथे हलविण्यात आले असता नागपूर जवळ पोचताच रुग्णवाहिका मध्येच त्याने प्राण सोडला

सदर दुचाकीस्वार लोहारा येथील अभिषेक प्रकाश साव-साकडे (२०) रा. लोहारा सिरपूर पहाडीच्या खाली बस आणि बाईक दोन्ही वाहनात समोरासमोर जोरदार धडक झाली. आणि अभिषेक त्याच्या पायाला दोन ठिकाणी फ्रॅर होऊन मोडल्याने गंभीर जखमी झाला. त्यामुळे त्याला तत्काळ रुग्णवाहिका पाचारण करून चिमूर येथील उपजिल्हारुग्णालय येथे नेण्यात आले होते. परंतु खूपच चिंताज्नक प्रकृती असल्यामुळे त्याला नागपूरला रुग्णवाहिकेने रवानगी करण्यात आली परंतु दुर्दैव असे की नागपूर जवळ वाटेतच त्याने आपला प्राण सोडला त्याचे पार्थिव परत आणून चिमूर येथील उपजिल्हारुग्णालयात शवविच्छेदन करण्यात आले. त्याच्या जाण्याने त्याची आई पोरकी झाली असून वडील आधीच गेल्यामुळे एकटीच राहिली आहे. या घटनेने लोहारा गावात शोककळा पसरली असून आज दुपारी त्याच्यावर आतिमसंस्कार करण्यात आले. सदर घटनेचे पुढील तपास चिमूर पोलीस करीत आहेत.

# सिल्ली येथे हंगामा कार्यक्रमात उपसभापतींसह चौघांना मारहाण

**साहसिक वृत्त/ ०४ नोव्हेंबर**

**भंडारा :** दिवाळी हंगामा कार्यक्रमात हुल्लडबाजी करणाऱ्या तरुणांना समजाविण्यासाठी गेलेल्या पंचायत समिती उपसभापतींसह चार आयोजकांना तरुणांनी बेदम मारहाण केली. ही घटना भंडारा तालुक्यातील सिल्ली या गावात मंगळवारी रात्री घडली. जखमींवर खासगी रुग्णालयात उपचार सुरु आहेत. याप्रकरणी एका विधीसंघर्षग्रस्त बालकासह पाच तरुणांवर कारधा पोलिसांनी गुन्हा नोंदवून या तरुणांना अटक केली आहे.

भंडारा तालुक्यातील सिल्ली येथे दिवाळीनिमित्त नृत्य हंगामा आयोजित केला होता. हा कार्यक्रम बघण्यासाठी आलेल्या तरुणांनी कार्यक्रमात हुल्लडबाजी करायला सुरुवात केली. त्यामुळे त्यांना समजावण्यासाठी भंडारा पंचायत समितीचे उपसभापती प्रशांत खोब्रागडे व त्यांचे अन्य चार सहकारी गेले. यावेळी या तरुणांनी शाब्दिक वाद घातला. हा वाद वाढून या तरुणांनी लाठयाकाठयांनी मारहाण केली. यात प्रशांत खोब्रागडे (५२), राजेंद्र साखरवाडे (३४), प्रशांत माकडे (२७) यांच्यासह आदेश देशमुख (१२) यांच्यासह चौघे जखमी झाले. जखमींना भंडारा येथील खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. याप्रकरणी उपसभापती खोब्रागडे यांच्या तक्रारीवरुन कारधा पोलिसांनी आशीष पडोळे (२५), कमलाकर अहिर (४२), निखील पाणबुडे (२८), अक्षय साखरवाडे (२५) यासह एका १६ वर्षीय मुलावर गुन्हा नोंदवून अटक केली आहे.

# ७ नोव्हेंबरला लोकशाही दिनाचे आयोजन

**साहसिक वृत्त/ ०४ नोव्हेंबर**

**गडचिरोली :** सर्व जनतेस सुचित करण्यात येते की, जिल्हाधिकारी कार्यालय, गडचिरोली येथील सभागृहात सोमवार, दिनांक ७ नोव्हेंबर २०२२ रोजी दुपारी ३.०० वाजता लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात आले आहे.

सदर सभेच्या दिवशी तक्रार अर्ज स्विकारण्याची वेळ दुपारी २ ते ३ वाजेपर्यत राहील आणि सभेला ३ वाजता सुरुवात होईल. ज्या तक्रारदारांना लोकशाही दिनात तक्रार अर्ज दाखल करावयाचा असल्यास, त्यांनी तालुका स्तरावरील लोकशाही दिनात दाखल केलेल्या तक्रारीचे निराकरण होवून प्राप्त झालेल्या अहवालावर समाधान न झाल्यास तालुका स्तरावरील प्राप्त अहवाल व टोकन क्रमांक जोडून जिल्हास्तरावर दिनांक ७ नोव्हेंबर २०२२ रोजी होणाऱ्या लोकशाही दिनात तक्रार अर्ज विहित नमुन्यात (प्रपत्र-१ अ ते १ ड) दोन प्रतित दाखल करणे आवश्यक राहिल. तसेच तक्रार/ निवेदन वैयक्तिक स्वरुपाची असावी.

अन्यथा अर्ज विचारात घेण्यात येणार नाही असे जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा लोकशाही दिन, गडचिरोली यांनी कळविले आहे.

# आफ्रिकेला लोळवत पाकच्या उपांत्य फेरीतील आशा जिवंत

## दक्षिण आफ्रिकेचा विजयरथ रोखला

**सिडनी (वृत्तसंस्था) :**

शादाब खानची धडाकेबाज अष्टपैलू कामगिरी, शाहीन शाह आफ्रिदीला गवसलेला सूर आणि इफ्तिकार अहमदचे अर्धशतक गुरुवारी पाकिस्तानला फळले. याच जोरावर पाकिस्तानने दक्षिण आफ्रिकेला ३३ धावांनी पराभवाची धूळ चारली. सामना गमावल्यामुळे टी-२० विश्वचषक २०२२ स्पर्धेतील दक्षिण आफ्रिकेचा विजयरथ रोखण्यात पाकला यश आले आहे. तसेच या सामन्यातील विजयामुळे पाकच्या उपांत्य फेरीतील आशा जिवंत आहेत.

या सामन्यातील निकालानंतर पाकिस्तानने ग्रुप २ मध्ये चार गुणांसह तिसऱ्या स्थानी मुसंडी मारली आहे. त्यामुळे आता उपांत्य फेरीत जाणार दुसरा संघ नेमका कोणता असणार? याकरिता चांगलीच चढाओढ रंगलेली पाहायला मिळले.



पावसाच्या व्यत्ययामुळे पाकिस्तानने दक्षिण आफ्रिकेला दिलेले १८५ धावाचे टार्गेट १४ षटकांत १४२ धावा असे करण्यात आले. कर्णधार टेम्बा बावुमा संयमी खेळी करत होता. डी कॉक एकही धाव न करता तंबूत परतल्यामुळे आफ्रिकेवर दबाव होता. पाकिस्तानचे गोलंदाज अतिशय भेदक गोलंदाजी करत असल्यामुळे दक्षिण आफ्रिकेचे फलंदाज एक-एक करून बाद होत होते. ९ षटकांनंतर पावसाच्या व्यत्ययामुळे सामना थांबवण्यात आला. त्यावेळी दक्षिण आफ्रिकेने ६९ धावा केल्या होत्या आणि त्यांचे ४ फलंदाज बाद झाले होते. मग पाऊस थांबल्यावर डीएलएस मेथडनुसार दक्षिण आफ्रिकेसमोर १४२ धावांचे टार्गेट ठेवण्यात आले होते. आफ्रिकेच्या टेम्बा बवुमाने सर्वाधिक ३६ धावा केल्या. त्यांचे अन्य फलंदाज धावा जमवण्यात अपयशी ठरले. अखेर दक्षिण आफ्रिकेचा संघ १०८ धावाच करू शकल्याने पाकिस्तान ३३ धावांनी विजयी झाला. पाकिस्तानच्या शाहीन शाह आफ्रिदीला अखेर या सामन्यातून सूर गवसला. त्याने ३ षटकांत १४ धावा देत ३ मोहरे टिपले. त्याला शादाब खान, नसीम शहा यांनी चांगली साथ दिली. शादाबने २, तर नसीमने १ बळी मिळवला.

**शादाब खान, शाहीन आफ्रिदी चमकले**

नाणेफेक जिंकत पाकिस्तान संघाने प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. ज्यानंतर पाकिस्तान संघाची सुरुवात खराब झाली. त्यांची स्टार जोडी रिझवान आणि बाबर आझम अनुक्रमे ४ आणि ६ धावा करून तंबूत परतले. मोहम्मद हॅरिसने २८ आणि शान मसूदने २ धावा केल्यानंतर तोही बाद झाला. शादाब खान (५२ धावा) आणि इफ्तिकार अहमदने (५१ धावा) दमदार अशी अर्धशतके झळकावली.

# आयसीसी प्लेयर ऑफ द मंथसाठी 'किंग कोहली' नॉमिनेट

**सिडनी (वृत्तसंस्था) :**



रन मशीन अशी ओळख असलेला विराट कोहली सध्या सुरू असलेल्या टी-२० विश्वचषक स्पर्धेत चांगलाच फॉर्मात आहे. धडाकेबाज कामगिरीमुळे त्याला यंदाच्या आयसीसी प्लेयर ऑफ द मंथसाठी नॉमिनेट करण्यात आले आहे. तसेच पुरस्काराचा तो प्रबळ दावेदार मानला जात आहे.

विराटसोबत विश्वचषक स्पर्धेत चांगली कामिगिरी करणारे आणखी दोन खेळाडूही नॉमिनेट झाले असून, यामध्ये झिम्बाब्वेचा सिकंदर रझा आणि दक्षिण आफ्रिकेचा डेव्हिड मिलर यांचा समावेश आहे. सिकंदर हा तर झिम्बाब्वे संघासाठी कमाल अष्टपैलू खेळी करत आहे. झिम्बाब्वेने यंदा उल्लेखनीय कामगिरी केली असून, यामध्ये सिकंदरचा मोठा वाटा आहे. मिलरही दक्षिण आफ्रिकेसाठी उत्तम खेळी करत असून, भारताविरुद्धच्या सामन्यात त्याने अप्रतिम फलंदाजी करत दक्षिण आफ्रिकेला विजय मिळवून दिला होता.

आयसीसीने क्रिकेटमध्ये उत्साह वाढवण्यासाठी या पुरस्काराची सुरुवात केली होती. प्रत्येक महिन्याला हा पुरस्कार दिला जातो. दरम्यान, पुरुष आणि महिला संघातील जे खेळाडू महिन्याभरात चांगली कामगिरी करून दाखवतात. त्यांची निवड करून त्यापैकी एकाला हा पुरस्कार दिला जातो. महिला क्रिकेटमध्ये भारताची जेमिमा रॉड्रिग्ज, दीप्ती शर्मा आणि पाकिस्तानच्या निदा दार यांना नामांकित करण्यात आले आहे.

# सामन्यादरम्यान 'फेक फिल्डिंग'

**ॲडलेड (वृत्तसंस्था) :**

भारतीय संघाने बुधवारी बांगलादेशवर रोमहर्षक विजय मिळवत टी-२० विश्वचषक स्पर्धेच्या उपांत्य फेरीत प्रवेश केला आहे. हा सामना भारताने केवळ ५ धावांनी जिंकला; परंतु हा सामना बांगलादेशच्या एवढा जिव्हारी लागला, की सामन्यानंतर बांगलादेश संघाचा यष्टीरक्षक आणि फलंदाज नुरुल हसनने सामन्यानंतर विराट कोहलीवर 'फेक फिल्डिंग' केल्याचा आरोप केला आहे. विराटने केलेली कृती पंचांनी वेळीच पाहिली असती, तर आम्हाला पाच अतिरिक्त धावा मिळाल्या असत्या, असे नुरुल म्हणाला आहे. सोशल मीडियावरही या संदर्भातील चर्चांना उधाण आले आहे.

लिटन दास आणि नाजमुल सांतो यांनी १८४ धावांचा पाठलाग करताना पाऊस सुरू होण्यापूर्वीच्या सात षटकांमध्ये भारतीय गोलंदाजीची पिसे काढली. सात षटकांमध्ये बिनबाद ६६ वरून बांगलादेशचा पराभव झाल्याने तो चाहत्यांबरोबरच खेळाडूंच्याही जिव्हारी लागला आहे. शेवटच्या षटकापर्यंत फलंदाजी करून नाबाद राहिलेल्या नुरुलने शेवटच्या षटकात अर्शदीप सिंगला एक चौकार आणि षटकार लगावत बांगलादेशच्या विजयाच्या आशा कायम ठेवल्या होत्या. पण पाच धावांनी त्यांनी हा सामना गमावला

**नुरुल हसनचा विराटवर आरोप**

आणि सोबत उपांत्य फेरीत पोहोचण्याची शक्यताही धूसर झाली आहे. सामन्यानंतर नुरुलने विराटवर खोटा थ्रो केल्याचा आरोप करत 'फेक फिल्डिंग'कडे इशारा केला. "पावसामुळे नक्कीच आमच्या खेळावर परिणाम झाला. पण यावेळी एक खोटा थ्रो करण्यात आला, ज्यामुळे आम्हाला पाच अतिरिक्त धावा मिळाल्या असत्या," असे नुरुलने म्हटले आहे.

ॲडलेडच्या मैदानावर झालेल्या सामन्यातील सातव्या षटकामध्ये कोहलीने केलेली कृती पंचांच्या नजरेतून हुकल्याचा दावा बांगलादेशी चाहत्यांकडून आणि खेळाडूंकडून केला जात आहे. सातव्या षटकाच्या तिसऱ्या चेंडूवर लिटन दासने सीमारेषेजवळ मारलेला चेंडू अर्शदीप सिंगने यष्टीरक्षक दिनेश कार्तिककडे फेकला, तेव्हा कोहलीने चेंडू आपल्याकडे टाकण्यात आला असून, आपण रिलेपद्धतीने तो नॉन स्ट्रायकर्स एण्डला फेकत असल्याची कृती केली. मात्र चेंडू अर्शदीपकडून थेट दिनेश कार्तिकच्या हातात विसावला. यावेळी मैदानातील पंच म्हणजेच मारिस एरॅसमस आणि ख्रिस ब्राऊन या दोघांनीही विराटची ही कृती पाहिली नाही. तसेच लिटन दास आणि सांतोनेही त्यावेळी ही कृती पाहिली नाही. सामन्यानंतर म्हणजेच पाच धावांनी पराभूत झाल्यानंतर मात्र नुरुल हसनने यावर आक्षेप घेत विराटवर 'फेक फिल्डिंग'चा आरोप केला आहे.

# जेजे हॉस्पिटलचा ९ विकेटने मोठा विजय

**मुंबई (वार्ताहर) :**

ओम्नी ट्रॉफी आंतर हॉस्पिटल टी-२० क्रिकेट स्पर्धेत जेजे हॉस्पिटलने बलाढ्य जसलोक हॉस्पिटलवर ९ विकेटने मोठा विजय मिळवून साखळी ड गटात प्रथम स्थान पटकाविण्याचे संकेत दिले आहेत. सामनावीर सुभाष शिवगण (नाबाद ४१ धावा व १ बळी), सलामीवीर अभिजित मोरे (३४ धावा व १ बळी) व रोहन म्हापणकर (नाबाद १० धावा व ३ बळी) यांच्या अष्टपैलू कामगिरीमुळे जेजे हॉस्पिटलने पहिला साखळी सामना आरामात जिंकून दोन गुण वसूल केले.

जसलोक हॉस्पिटलने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी स्विकारली. सलामीवीर सचिन दुधवडकर (३६ चेंडूत ३५ धावा, ४ चौकार) व त्यानंतर भूषण कदम (३५ चेंडूत नाबाद ३३ धावा, ३ चौकार) यांनी जसलोक हॉस्पिटलतर्फे उत्तम

**ओम्नी ट्रॉफी आंतर हॉस्पिटल क्रिकेट स्पर्धा**

फलंदाजी करूनही जेजे हॉस्पिटलच्या सर्वच गोलंदाजांनी ठरावीक अंतराने विकेट घेणारी अचूक गोलंदाजी केली. परिणामी जसलोक हॉस्पिटलचा डाव २० षटकांत ८ बाद ९९ धावसंख्येवर थबकला. रोहन म्हापणकर (१७ धावांत ३ बळी) व जगदीश वाघेला (१७ धावांत २ बळी) यांनी प्रमुख फलंदाजांना तंबूची दिशा दाखविली.

सलामीवीर अभिजीत मोरे (४२ चेंडूत ३४ धावा, १ षटकार व २ चौकार) व सुभाष शिवगण (४६ चेंडूत नाबाद ४१ धावा, ६ चौकार) यांनी धावफलक सतत हलते ठेऊन ८३ धावांची सलामी भागीदारी केली. त्यामुळे जसलोक हॉस्पिटलचे गोलंदाज हतबल झाले. परिणामी जेजे हॉस्पिटलने १६व्या षटकाअखेर विजयी चौकारासह १ बाद १०२ धावा फटकावून सामना जिंकला. आयडियल स्पोर्ट्स ॲकॅडमी-ग्रुप आणि ओम्नी ग्लोबल स्पोर्ट्स मॅनेजमेंटतर्फे ही स्पर्धा नवरोज खेळपट्टी-आझाद मैदान येथे सुरू आहे.

# २० नोव्हेंबरपासून कतारमध्ये फुटबॉलचा विश्वचषक

**लंडन (वृत्तसंस्था) :**

फुटबॉलचा विश्वचषक यंदा कतार येथे होणार आहे. २० नोव्हेंबर रोजी रात्री ९.३० वाजता कतार आणि इक्वेडोर यांच्यातील सामन्याने या भव्य स्पर्धेची सुरुवात होईल. या स्पर्धेत जगभरातील ३२ सर्वोत्तम संघ सहभागी होत असून, २० नोव्हेंबर ते १८ डिसेंबर या कालावधीत ही स्पर्धा पार पडणार आहे.

ग्रुप स्टेजमध्ये, प्रत्येक संघ त्यांच्या गटातील इतर तीन संघांविरुद्ध एक सामना खेळेल. प्रत्येक गटातील टॉप २ संघ राऊंड ऑफ १६च्या फेरीत प्रवेश करतील. जिथून बाद फेरीचे सामने सुरू होतील. म्हणजेच विजयी संघ पुढे जातील आणि पराभूत संघ विश्वचषकातून बाहेर पडतील. राऊंड ऑफ १६ मध्ये आठ सामने होतील, ज्यामध्ये १६ पैकी आठ संघ सामना जिंकून उपांत्यपूर्व फेरीत पोहोचतील. उपांत्यपूर्व फेरीत चार सामने होणार असून विजयी चार संघ उपांत्य फेरीत प्रवेश करतील. उपांत्य फेरीनंतर अंतिम सामना १८ डिसेंबरला खेळवला जाईल. ग्रुप स्टेजचे सामने २० नोव्हेंबर ते २ डिसेंबर दरम्यान खेळवले जातील.

# भेंडखळला शनिवारी मुलींची क्रिकेट निवड चाचणी

**अलिबाग :** रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनतर्फे उरण तालुक्यातील भेंडखळ क्रिकेट अकादमी मैदानावर ५ व ६ नोव्हेंबर रोजी १५ वर्षांखालील मुलींची क्रिकेट निवड चाचणी होणार आहे. या चाचणीतून रायगडच्या मुलींचा संघ निवडण्यात येणार असल्याची माहिती रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष चंद्रकांत मते यांनी दिली. १ सप्टेंबर २००७ रोजी अथवा त्यानंतर व ३१ ऑगस्ट २००९ पूर्वी जन्मलेल्या रायगड जिल्ह्यातील मुली या निवड चाचणीत पात्र ठरतील. पांढरा क्रिकेट गणवेश घालून मुलींनी मैदानावर सकाळी आठ वाजता उपस्थित राहणे आवश्यक आहे. यासाठी मुलींनी आपली नोंदणी करणे गरजचे आहे. त्यासंदर्भातील अर्ज जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या फेसबुक पेजवर (@rdca2017) उपलब्ध आहे. नावनोंदणी केलेल्या मुलींनाच चाचणीत प्रवेश देण्यात येणार आहे.

# मुंबई पोलीस जिमखान्याची उपांत्य फेरीत धडक

**मुंबई (वार्ताहर) :**

बुधवारी ३ बाद ४५६ धावांवर डाव घोषित असा डोंगर रचणाऱ्या दिलीप वेंगसरकर अकादमीने गुरुवारी आपले प्रतिस्पर्धी पय्याडे स्पोर्ट्स क्लबचा केवळ १३४ धावांत खुर्दा करून १०व्या संतोषकुमार घोष (१६ वर्षांखालील) क्रिकेट स्पर्धेमध्ये उपांत्य फेरीत प्रवेश केला. पहिल्या

**दहावी संतोषकुमार घोष क्रिकेट स्पर्धा**

दिवशी रोहन करंदीकर (नाबाद २०० धावा) आणि हर्ष आघाव (१७६ धावा) यांनी गाजविल्यावर डावखुरा स्पिनर अगस्त्य बंगेरा (५०/६) आणि दर्श मुरकुटे (४८/४) यांनी आपली भूमिका समर्थपणे पार पाडली. त्यांनी आदित्य विश्वकर्मा (३६ धावा) आणि शौर्य शरण (४४ धावा) यांचा अपवाद वगळता बाकी फलंदाजांना डोके वर काढू दिले नाही.




स्पोर्टिंग युनियन आणि कल्याणदास मेमोरियल स्पोर्ट्स फाऊंडेशनने आयोजित केलेल्या स्पर्धेमध्ये मुंबई पोलीस जिमखाना, दादर पारशी कॉलनी आणि स्पोर्ट्स फिल्ड या अन्य तीन संघांनी शेवटच्या चार संघांमध्ये प्रवेश प्राप्त केला. स्पोर्ट्स फिल्डच्या हृषिकेश चव्हाण याने दुसऱ्या डावात १२८ धावांची शानदार खेळी केली. त्याने ११७ चेंडूंचा मुकाबला केला व त्या दरम्यान २० चौकार मारले. त्यामुळे गे कॅव्हेलियर्सला सामना निर्णायकपणे जिंकण्याच्या उरल्या सुरल्या असणाऱ्या आशा मावळल्या. स्पोर्ट्स फिल्डने पहिल्या डावात ६२ धावांची आघाडी घेतली होती. त्यांनी दुसऱ्या डावात २८० धावा केल्या.

आता उपांत्य फेरीत दिलीप वेंगसरकर अकादमी विरुद्ध मुंबई पोलीस जिमखाना आणि स्पोर्ट्स फिल्ड विरुद्ध दादर पारशी कॉलनी अशा लढती होतील, तर स्पर्धेचा अंतिम सामना ८-९ नोव्हेंबर रोजी शिवाजी पार्कवर होईल.

# फ्रेंडशिप क्रिकेट क्लबचा हीरक महोत्सवी मित्र मेळावा

**ठाणे (वार्ताहर) :**

टेनिस बॉल क्रिकेटपासून सुरुवात करणाऱ्या आणि पुढे सिझन बॉल क्रिकेटमध्ये आपला दबदबा निर्माण करणाऱ्या फ्रेंडशिप क्रिकेट क्लबच्या हीरक महोत्सवी वर्षानिमित्त मंगळवार ८ नोव्हेंबर रोजी हीरक महोत्सवी मित्र मेळाव्याचे आयोजन केले असल्याची माहिती क्लबचे सहकार्यवाह आणि ज्येष्ठ गुणलेखक बळवंत सकपाळ यांनी दिली.

क्लबचे हीरक महोत्सवी वर्ष साजरे करताना क्लबचे संस्थापक क्रिकेटपटू मोहन नाखवा, कमलाकर कोळी, जगदीश कोळी आणि सुरेश ठाणेकर या वैवाहिक जीवनाचे अर्धशतक पूर्ण करणाऱ्या दाम्पत्याचा गौरव करण्यात येणार आहे. क्लबच्या या सात वर्षांतील संस्मरणीय क्षणांच्या कृष्णधवल, रंगीत छायाचित्रांचा समावेश असलेल्या स्मरणिकेचे प्रकाशन क्लबचे ८८ वर्षीय ज्येष्ठ क्रिकेटपटू मदन नाखवा यांच्या हस्ते करण्यात येणार असल्याचे क्लबचे सचिव प्रल्हाद नाखवा यांनी सांगितले.

## सोनेरी कॉर्नर

### सनी लिओनी मला हिंदीत बोलता येते!



सनी लिओनीला हिंदी भाषा बोलता येते. बॉलीवूडमध्ये पदार्पण केल्यानंतर तिला फारसे हिंदी येत नसावे असे अनेकांना वाटले होते, पण तिने दिलेल्या अनेक मुलाखतींत सनी उत्तम हिंदी भाषा बोलताना दिसली. तिचा पापाराझी छायाचित्रकारांना हिंदी भाषेत उत्तर देतानाचा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर तुफान व्हायरल झाला आहे. सनी पंजाबी तसेच हिंदी भाषा उत्तम बोलते. सध्या सनी काही कामानिमित्त मुंबईबाहेर गेली आहे. यादरम्यान मुंबई विमानतळावर तिला पापाराझी छायाचित्रकारांनी घेरले. यावेळी पापाराझी छायाचित्रकारांना तिने आपल्याला उत्तम हिंदी येत असल्याची आठवण करून दिली. ती म्हणाली, तुम्हाला असे वाटते का मी हिंदी भाषेमध्ये बोलू शकत नाही? तुम्हीच इंग्रजी भाषेमध्ये संवाद साधता तर मी काय करू? तसेच धन्यवाद, उद्या भेटू. असे वाक्य ती पुन्हा बोलताना व्हिडीओत दिसली.

### 'दिल तो पागल है'ची अद्यापही क्रेझ



शाहरुख खान, माधुरी दीक्षित आणि करिश्मा कपूर यांची मुख्य भूमिका असलेल्या 'दिल तो पागल है' या चित्रपटाला नुकतीच २५ वर्षे पूर्ण झाली आहेत. या चित्रपटातील गाणीही प्रचंड गाजली आणि त्या गाण्यावरील नृत्येही गाजली. याच चित्रपटाबद्दल कोरिओग्राफर श्यामक दावर यांनी चित्रपटावर भाष्य केले आहे. या चित्रपटाचा परिणाम आजही चित्रपटसृष्टीवर जाणवत असल्याचे ते म्हणाले. दावर म्हणाले, चित्रपटाला २५ वर्षे पूर्ण झाली असली तरी मला तर १५ वर्षे पूर्ण झाल्यासारखीच वाटत आहेत. या चित्रपटातून आपल्या आयुष्यातील जोडीदारावर यश चोप्रा यांनी भाष्य केले. ही प्रेमकहाणी मांडताना त्यांनी नृत्य या माध्यमाचा योग्य वापर केला. या चित्रपटासाठी सर्वोत्तम कोरिओग्राफरचा राष्ट्रीय पुरस्कारही मला मिळाला होता. चित्रपटामुळे नृत्याकडे बघायचा दृष्टिकोनच बदलला. या चित्रपटामुळे चित्रपटसृष्टीतील नृत्यांमध्ये खूप मोठा बदल झाला असे आजही अनेक लोक सांगत असतात. हा चित्रपट पुन्हा बनवायचा झाल्यास तो माझ्याशिवाय बनूच शकत नाही, कारण 'दिल तो पागल है' म्हणजे मी असे समीकरण रूढ झाले आहे.

### आर्यन खान पुन्हा चर्चेत



नुकतेच बॉलीवूड कलाकारांनी घरी दिवाळी पार्टीचे आयोजन केले होते. आता या पार्ट्यांना स्टार किड्सदेखील हजेरी लावत असतात, दिवाळी पार्टीनंतर आता स्टार किड्सनी हॅलोवीन पार्टी आयोजित केली होती. नुकतेच त्याचे फोटो व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाले शनिवारी रात्री या पार्टीचे आयोजन करण्यात आले होते. या पार्टीला आर्यन खान, अनन्या पांडे, शनाया कपूर आणिअन्य बॉलीवूड सेलिब्रेटी हजर होते. या पार्टीतला आर्यन खानचा व्हिडीओ व्हायरल होत आहे, ज्यात त्याने काळ्या रंगांचे कपडे घातले आहेत आणि चंदेरी जॅकेट त्यावर घातले आहे. खास पार्टीसाठी त्याने डोळ्यांचा विशिष्ट लूक केला आहे. याचा व्हिडीओ व्हायरल होताच नेटकऱ्यांनी कमेंट करण्यास सुरुवात केली आहे. एकाने लिहिले आहे की, 'फोटोग्राफर मंडळींना थोडा तरी आदर दाखव', तर एकाने लिहिले आहे 'याला एवढी विनंती करण्याची गरज नाही'. काहींनी लिहिले आहे 'याला खूपच माज आलेला दिसतोय'. 'वडिलांच्या पैशावर माज दाखवतोय' असेही काही जण म्हणाले आहेत.

### माझे ट्विटर अकाऊंट मला पुन्हा मिळू शकते



बॉलीवूड अभिनेत्री कंगना राणावत नेहमीच चर्चेत असते. सध्या ती तिच्या ट्विटर अकाऊंटमुळे चर्चेत आली आहे. मे २०२१ मध्ये कंगनाचे ट्विटर अकाऊंट सस्पेंड करण्यात आले होते. ट्विटर कंपनीच्या कायद्याचे उल्लंघन केल्याने तिच्यावर ही कारवाई झाली होती. ॲलन मस्क यांनी ट्विटरची मालकी घेतल्यानंतर सीईओ पराग अग्रवाल यांच्यासह काही अधिकाऱ्यांना पदावरून काढून टाकले. यानंतर कंगनाला तिचे अकाऊंट पुन्हा मिळू शकते, अशी शक्यता वर्तवली जात आहे. नुकतेच कंगनाने तिचे ट्विटर अकाऊंटबद्दल स्पष्टपणे भाष्य केले. नुकत्याच दिलेल्या एका मुलाखतीत तिने तिच्या खास शैलीत उत्तरे दिली. मी ट्विटरवर एक वर्षासाठी होते, पण एक वर्षही ट्विटर मला सहन करू शकले नाही. बघा विचार करा. काही लोक दहा वर्षे ट्विटरवर सक्रिय आहेत. त्यानंतर मी इन्स्टाग्रामवर सक्रिय झाले, पण त्यावरही मला तीन वेळा नोटीस आली आहे. त्यानंतर मात्र मी स्वत: इन्स्टाग्राम वापरतच नाही. माझी टीम त्या सर्व गोष्टी पाहते आणि जेव्हापासून माझ्या टीमने इन्स्टाग्राम चालवणे सुरू केले, तेव्हापासून कोणाला काहीही तक्रार नाही. सर्व काही ठीक चालले आहे.

# महाराष्ट्राला सातव्यांदा दुहेरी मुकुट

## ३२ वी किशोर-किशोरी राष्ट्रीय खो-खो स्पर्धा

**फलटण (वार्ताहर) :**

३२व्या राष्ट्रीय किशोर-किशोरी अजिंक्यपद खो-खो स्पर्धेत महाराष्ट्राने घडसोली मैदानावरील आमदार श्रीमंत विजयसिंहराजे ऊर्फ शिवाजीराजे मालोजीराजे नाईक-निंबाळकर क्रीडा संकुलात बुधवारी पुन्हा एकदा इतिहास रचला. लागोपाठ दोन वर्षांत महाराष्ट्राने दुहेरी मुकुट मिळवला आहे.

गेल्या वर्षी उना, हिमाचल प्रदेश येथील इंदिरा गांधी स्टेडीयमवर सुध्दा इतिहास रचत महाराष्ट्राने सहव्यांदा दुहेरी मुकुट मिळवला होता. त्या आठवणी या १४ वर्षांखालील किशोर-किशोरींनी ताज्या केल्या. गतवर्षी महाराष्ट्राच्या किशोरांनी कर्नाटकवर, तर किशोरींनी पंजाबवर विजय मिळवला होता. बुधवारी ३२व्या किशोर-किशोरी राष्ट्रीय अजिंक्यपद खो-खो स्पर्धेची सांगता झाली. महाराष्ट्राच्या किशोर व किशोरी दोन्ही संघानी डावाने विजय मिळविण्याची घोडदौड कायम राखत किशोर-किशोरी गटाच्या ३२व्या राष्ट्रीय अजिंक्यपद खो-खो स्पर्धेचे विजेतेपद कायम राखले. कर्णधार राज जाधव व धनश्री कंक हे अनुक्रमे सर्वोत्कृष्ट भरत व इला पुरस्काराचे मानकरी ठरले. या स्पर्धेच्या अंतिम फेरीत महाराष्ट्राच्या किशोरांनी व किशोरींनी कर्नाटकवर विजय मिळवत दुहेरी मुकुटासह अजिंक्यपद मिळवले. किशोर गटाने आतापर्यंत ११ वेळा, तर किशोरी गटाने १६ वेळा विजेतेपद पटकाविले आहे.



अंतिम फेरीच्या सामन्यात महाराष्ट्राच्या किशोर संघाने कर्नाटकवर १३-०७ असा एक डाव ६ गुणांनी विजय मिळवला. महाराष्ट्राने सुरुवातीपासूनच कर्नाटकला डोके वर काढण्याची जराही संधी दिली नाही. प्रशिक्षक प्रफुल्ल हाटवटे यांचा या विजयात सिंहाचा वाटा आहे. खेळाडूंची गुणवत्ता हेरून त्यांना संधी दिली व त्या खेळाडूंनी सुद्धा संधीचे सोने केल्याचे त्यांनी सांगितले. महाराष्ट्राच्या पहिल्या तुकडीतीलच कर्णधार राज जाधव १.४०, आशीष गौतम २.२५, हाराद्या वसावे २.५० मिनिटे संरक्षणाची भक्कम बाजू सांभाळली. आक्रमणात आशीष व हाराद्या यांनी प्रत्येकी ३ गडी टिपले. दुसऱ्या संरक्षणात राजने २.३० व जितेंद्र वसावे याने २.०० मिनिटे पळती केली. कर्नाटककडून कुमार याने १.१० व २ गुण, तर चेतन याने ५० सेकंद पळती करीत २ गुण मिळविले.

महाराष्ट्राच्या किशोरींनी अंतिम फेरीच्या सामन्यात कर्नाटकला ९-०५ असा एक डाव ४ गुणांनी धूळ चारली. या स्पर्धेतील सर्व सामने डावाने जिंकले होते. खेळाडूंमध्ये समन्वय घडवणे व त्यांच्यातील क्षमता ओळखून त्यांच्याकडून अप्रतिम कामगिरी घडवून घेणे हे काम प्रशिक्षक अमित परब यांनी अतिशय उत्कृष्टपणे पार पाडले. प्रथम संरक्षण करताना महाराष्ट्राच्या पहिल्या तुकडीतील संरक्षकांनी भक्कम बाजू सांभाळली. कर्णधार धनश्री कंक २.३० व विद्या तामखडे नाबाद ३.०० मिनिटे पळती केली. पहिल्या डावात महाराष्ट्राचे २ गडी बाद झाले. महाराष्ट्राने आपल्या पहिल्या आक्रमणात ९ गडी टिपले. यात धनश्री, विद्या व प्राजक्ता बनसोडे यांनी प्रत्येकी २ गडी टिपले, तर दुसऱ्या संरक्षणात धनश्री कंकने २.५० व विद्या तामखडेने ३.५० मिनिटे पळती केली व मोठा विजय साजरा केला, तर कर्नाटककडून हर्शिता (१.५० मिनिटे व २ गुण) व सुस्मिता (१.३० मिनिटे व १गुण) यांनी अष्टपैलू खेळी करीत लढत दिली.

दैनिक साहसिक

शनिवार ०५ नोव्हेंबर २०२२

# ओबीसींच्या विद्यार्थ्यांनी काय पाप केलय!

## एस सी विद्यार्थ्यांना स्वाधार, एस टी ला स्वयं तर आता मराठा विद्यार्थ्यांसाठी पंजाबराव देशमुख निर्वाह योजना!

**साहसिक वृत्त / ४ नोव्हेंबर**

**वर्धा :** मागील तीन वर्षापुर्वि महाराष्ट्रात तब्बल ७२ वर्षानंतर महाज्योतीची ओबीसी विद्यार्थ्यांसाठी निर्मिती झाली. पण त्यातुन ओबीसींना खुप काही घबाड मिळते असा समज झाल्यामुळे, मराठा समाज आरक्षण उपाययोजना मंत्रीमंडळ उपसमितीचे अध्यक्ष व मंत्री चंद्रकांत पाटील यांनी ओबीसी प्रमाणेच मराठा विद्यार्थ्यांना पंजाबराव देशमुख निर्वाह भत्ता योजना सुरू करण्यात येईल, व त्या व्दारे बाहेर गावी शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना वर्षाकाठी साठ हजार निधी देण्याची घोषणा केली, व ती तत्काळ अंमलातही आणली. प्रत्यक्षात ओबीसींची अशी अवस्था आहे की, स्वातंत्र्यानंतरच्या ७५ वर्षानंतर सुध्दा महाराष्ट्रात ओबीसींसाठी शासनाचे एकही वसतीगृह नाही. अनेक वर्षापासुन शासनाकडुन ओबीसींची वसतीगृहे होणार अशा निव्वळ फोलकट घोषणा होत आहे. देवेंद्र फडणविसांनी नुकतीच ७२ वसतीगृहाची केलेली घोषणा ही त्यांची सहावी घोषणा आहे. त्यातही अशी मेख मारून ठेवली आहे की, केंद्र शासनाचा ६०टक्के निधी मिळाल्यावरच ही वसतीगृहे सुरू करणार आहेत. आता केंद्राचे ओबीसींसाठी बजेटच नसल्यामुळे,ते मिळणार नाही, आणि हे केंद्राकडे बोट दाखवुन, ते आल्यावर करणारच अशी दिशाभुल करणार!अशा प्रकारे ओबीसींसाठी वसतीगृहही नाही, आणि एस सी एस टी किंवा आता मराठा विद्यार्थ्यांप्रमाणे निर्वाह भत्ता योजनाही नाही. ओबीसी समाजातील अनेक गुणवंत विद्यार्थ्यांना पुणे मुंबई नाशिक सारख्या ठिकाणी,चांगल्या शिक्षण संस्थात प्रवेश मिळुनही,शासकीय वसतीगृहे किंवा आधार सारख्या पर्यायी योजना नसल्यामुळे, शेवटी घरी परत येतात. त्यामुळे ओबीसी विद्यार्थ्यांसाठी सुध्दा ज्ञानज्योती

(उर्वरित पान २ वर)

# आसटकर दांपत्य शिवाजी महाराज राष्ट्रीय गौरव पुरस्काराने गौरान्वित




**साहसिक वृत्त / ४ नोव्हेंबर**

**वर्धा :** महाराष्ट्रातील विविध क्षेत्रात वैशिष्टपूर्ण काम करणाऱ्या व्यक्तींना वैजापुर औरंगाबाद जिजाऊ बहुउद्धेशिय सेवाभावी संस्थेच्यावतीने छत्रपती शिवाजी महाराज राष्ट्रीय गौरव पुरस्कार ५१ मान्यवरांना प्रदान करण्यात येतो .

यावर्षीच्या पुरस्कारार्थी मध्ये उमेश आसटकर व ललिता आसटकर यांना या राष्ट्रीय पुरस्काराने वैजापुर औरंगाबाद येथे मान्यवरांचे हस्ते गौरान्वित करण्यात आले.

उमेश आसटकर हे शिक्षण विभागात कार्यरत असून बालकांसाठी विविध उपक्रम राबवून भावी पिढी घडविण्याचे काम करीत आहेत, स्वप्रयत्नाने त्यांनी त्यांच्या शाळेचे रूपडे पालटून जिथे जिल्हा परिषद शाळेतील पटसंख्या कमी होत असतांना त्यांनी शाळेचा पट वाढविला.परिपाठापासून ते विविध उपक्रमात त्यांचे विदयार्थी नेहमीच रममाण होतात.

ललिता आसटकर ह्या एक उपक्रमशिल पर्यवेक्षिका म्हणून सर्वांना परिचित असून त्या महीला बालविकास विभागात कार्यरत आहेत.

त्यांनी केलेल्या कार्यासाठी मा. मुख्यमंत्री , महिला बालकल्याण मंत्री,रिलांयन्स , सिंधुताई सपकाळ, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण मंडळ पुणे यांच्या हस्ते गौरवन्वित करण्यात आले आहे. त्यांच्या उपक्रमाची दखल आयुक्त स्तरावर घेणयात आली आहे. उभयतांनी कोविड काळात स्वखर्चातून गरजुंना मदत केलेली आहे. संपुर्ण विश्वाचे आदर्श राजे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या नावाने राष्ट्रीय पुरस्कार मिळणे हे आमचे भाग्य असून कार्याप्रती असलेली श्रद्धा प्रगाढ होण्यास प्रेरणा देणारे असल्याच्या प्रतिक्रिया उमेश आसटकर व ललिता आसटकर यांनी व्यक्त केल्या

# केन्द्र सरकार व राज्यसरकारच्या माध्यमातुन शहरी भागासोबतच ग्रामीण भागाच्या विकासाला चालना मिळेल- खासदार रामदास तडस

## सेलु तालुक्यातील जामनी, आमगांव, मदनी, क्षिरस-मुद्रपुर येथे जल जीवन मिशन अंतर्गत रु. २६८.४८ लक्ष रुपयाच्या पाणी पुरवठा योजनेचा भुमीपूजन संपन्न.



**साहसिक वृत्त / ४ नोव्हेंबर**

**वर्धा :** देशाचे लोकप्रीय प्रधानमंत्री श्री. नरेन्द्रजी मोदी यांनी प्रत्येक घरात व प्रत्येक व्यक्तीला पिण्याचं शुद्ध पाणी देण्याचा उद्देशाने जलजीवन मिशन अंतर्गत 'हर घर नल, हर घर जल'' योजना कार्यान्वीत केली आहे, केन्द्रसरकार व राज्यसरकारच्या वतीने प्रत्येक गावात ही योजना अमलात आलेली आहे, त्यामुळे प्रत्येक नागरिकाला शुध्द पाणी मिळणार आहे. मागील आघाडी सरकारच्या काळात अनेक प्रकल्पांना स्थगीती देण्यात आलेली होती, त्यामुळे अनेक ग्रामीण भागातील कामे प्रलंबीत होते, परंतु आता युती सरकार मध्ये अनेक प्रलंबीत कामांना गती मिळालेली आहे, केन्द्र सरकार व राज्यसरकारच्या माध्यमातुन शहरी भागासोबतच ग्रामीण भागाच्या विकासाला चालना मिळेल असे यावेळी खासदार रामदास तडस म्हणाले.

आज जलजीवन मिशन अंतर्गत

(उर्वरित पान २ वर)

# कंत्राटी आरोग्य सेविकांचा आंदोलनाचा दुसरा दिवस

## कुटुंबासह जिल्हा परिषद वर्धा समोर आंदोलन



**साहसिक वृत्त / ४ नोव्हेंबर**

**वर्धा :** आयटक संलग्न महाराष्ट्र राज्य आरोग्य खाते कंत्राटी नर्सेस युनियन च्यावतिने जिल्हा परिषद समोर आयटकच्या नेतृत्वाखाली साखळी उपोषण दुसऱ्याही दिवशी कुटुंबासह करण्यात आले . या आंदोलनाला काँग्रेसचे शहर अध्यक्ष सुधीर पांगुळ समता परिषद विशाल हजारे आयटक जिल्हा अध्यक्ष काँ मनोहर पचारे सुरेश गोसावी फिनिक्स अँकेडमीचे निलेश कराडे गुरुजी .सामुदायीक आरोग्य अधिकारी संघटनेचे अक्षय इंगळे यांनी पांठीबा दिला.

वर्धा जिल्ह्यात १३३ नियमित आरोग्य सेविकांची पदे रिक्त असल्यामुळे कंत्राटी आरोग्य सेविकांना नियुक्ती ठिकाणी काम करु न देता इतर ठिकाणी काम करण्यास स्थानिक प्रशासनाने भाग पाडले मग उपकेंन्दात प्रसृती कशी होणार ? तसेच पाचोडची कंत्राटी आरोग्य सेविका रत्नमाला कामडी १० वर्षापासून रोहना येथे काम करीत आहे .प्रसृती गृह नाही तरी

(उर्वरित पान २ वर)

# वर्ध्येच्या स्वावलंबी मैदानात रंगणार महाकाली शिक्षण संस्था प्रस्तुत क्रिकेट प्रीमियर लीग सीझन ३ चे सामने

**साहसिक वृत्त / ४ नोव्हेंबर**

**वर्धा :** जिल्ह्यातील वरीष्ठ क्रिकेट खेळाडूच्या वतीने वर्धा प्रीमिअर क्रिकेट लीग ०३ चे आयोजन करण्यात येत आहे. या सामान्यांना ०६ नोव्हेंबर पासून सुरुवात होत आहे शहरासह ग्रामीण भागातील खेळाडू गावपातळीवर खेळ खेळतात त्यांच्या गुणांना वाव मिळावा म्हणून या स्पर्धा चे आयोजन केले जाते.

वर्धा जिल्ह्यातील नामवंत उद्योजक , व्यवसायिक व क्रिकेटप्रेमी संघमालक यामध्ये राहणार आहेत. (संघ मालकांमध्ये असणारे डॉ. विपीन राऊत सर, डॉ. अमोल सिंघम सर, गौरव नालोडे सर, फिरोज मस्तान सर आणि बालू वरघने सर, नितेश कराळे सर,अविनाश सेलुकर सर, विराज शिंदे सर,मनीष वेले सर, श्रेय शर्मा सर, चेतन वांदिले सर ) त्यांनी स्वतः संघ निवडला असून, एका संघात १६ खेळाडू राहणार आहे संपूर्ण १० संघ मिळून १६० खेळाडूंची निवड करण्यात आली त्यामध्ये U-१६ च्या खेळाडूंची पण निवड करण्यात आली . यात सहभागी होण्यासाठी खेळाडू हा वर्धा जिल्ह्यातील असणे आवश्यक होते, नोंदणी फॉर्म भरणे आणि चाचणी देणे या सर्व अटीवर खेळाडूची खेळ बघून निवड करण्यात आली.

वर्धा येथील स्वावलंबी मैदानात साखळी पद्धतीने सामने खेळविले जाणार आहेत. या स्पर्धेचे आयोजन सदस्य वैभव कवडे,महेश झाटे , आशिष केचे,निलेश नाले , प्रतीक राऊत , सौरभ इंगोले , अमित पठाण, पंकज हटवार,भरत पटील, प्रणय ठाकरे,मोहन इंगळे, गोलू कोकाटे ,प्रसाद मुर्डीले , लोकेश नरुले, राजेश पवार ,रुपेश डायगव्हाणे व रोहित कमलासन यांच्याशी संपर्क करणे अनिवार्य होते. ज्या खेळाडूंना या वर्षीला चाचणी देता आली नाही त्यांनी पुढील वर्षीसाठी आयोजकांशी संपर्क करून ठेवावा असे ही आयोजकांनी सांगितले आहे.

यामध्ये बऱ्याच मोठ्या प्रमाणात प्रायोजक मंडळ सोबत जुळून आलेत. उद्योजक, व्यावसायीक व्यक्ती याचाशी जुळले आहे. प्रेक्षकांसाठी सर्व सामने ब्दलूलं वरती लाईव्ह दाखवण्यात येणार असून आपण स्वावलंबी क्रिकेट मैदानावरील पण हे सामने जाऊन (९:०० ते ०५:००) च्या दरम्यान बघू शकता. प्रेक्षकांचा प्रतिसाद हा

(उर्वरित पान २ वर)

# विद्या विकास महाविद्यालयात राष्ट्रीय एकता दिवस साजरा



**साहसिक वृत्त / ४ नोव्हेंबर**

**समुद्रपूरः** स्थानिक विद्या विकास महाविद्यालयातील शैक्षणिक सांस्कृतिक व क्रीडा समितीच्या वतीने लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंती निमित्त राष्ट्रीय एकता दिवस या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष आदरणीय पांडुरंगजी तुळसकर हे होते. प्रमुख अतिथी म्हणून संस्थेचे सचिव डॉ. उमेशजी तुळसकर हे होते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. किशोरचंद्र रेवतकर, उपप्राचार्य डॉ.नयना शिरभाते, कनिष्ठ विभागाचे पर्यवेक्षक प्रा. किरण वैद्य व नगर परिषद समुद्रपूरचे उपाध्यक्ष मा. बाबारावजी थुटे हे मंचकावर उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलन व महापुरुषांच्या प्रतिमांच्या पूजनाने झाली. डॉ. स्वाती येवतकर यांनी राष्ट्रीय एकता दिवस शपथेचे वाचन केले व त्या पाठोपाठ इतर उपस्थित सर्व मान्यवरांनी व विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय एकता दिवस शपथ घेतली. ज्याप्रमाणे सरदार वल्लभभाई पटेल यांनी देशातील एकता व अखंडता कायम राहावी यासाठी सदोदित प्रयत्न केले त्याचप्रमाणे शिक्षकांनी आपल्या विद्यार्थ्यांमध्ये देश सेवेची भावना निर्माण करावी असे विचार कार्यक्रमाचे अध्यक्ष आदरणीय पांडुरंगजी तुळसकर यांनी मांडले. देशातील प्रत्येक नागरिकाने देशसेवेचे व्रत घेऊन राष्ट्राविषयी प्रेम जागृत केले पाहिजे असे मत डॉ. उमेशजी तुळसकर यांनी मांडले. प्राचार्य डॉ. किशोरचंद्र रेवतकर यांनी सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जीवन चरित्रावर प्रकाश टाकला व राष्ट्रीय एकता कायम ठेवण्यासाठी प्रत्येक नागरिकांनी प्रयत्न केले पाहिजे असे प्रतिपादन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजना प्रमुख प्रा. मेघशाम ढाकरे यांनी केले तर आभार प्रदर्शन डॉ. शिल्पा समदुरकर यांनी केले. कार्यक्रमाला रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ नितीन आखूज,डॉ अर्चना भेंडे, प्रा विलास बैलमारे,प्रा चंद्रकांत सातपुते डॉ मंगला खुणे महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.

# श्री संत खटेश्वर महाराज पुण्यतिथी महोत्सव सोहळ्याला प्रारंभ



**साहसिक वृत्त / ४ नोव्हेंबर**

**देवळी :** श्री संत खटेश्वर महाराज पुण्यतिथी महोत्सव आज दिनांक ५ ते ११ नोव्हेंबर पर्यंत श्री खटेश्वर महाराज देवस्थान मध्ये पुण्यतिथी महाउत्सव सोहळा सुरू होत असून संपन्न होत आहे.यावेळी दररोज पहाटे ४ ते ६ पर्यंत काकड आरती,सकाळी ७ ते ८ पर्यंत श्री संत खटेश्वर महाराज चरित्र वाचन,आणि सकाळी ९ ते ११ पर्यंत भागवत कथा,दुपारी २ ते ४ वारकरी महिला मंडळाचे भजन,सायंकाळी ४ ते ५ हरिपाठ,व रात्री ६ ते ९ भागवत कथेचे प्रयोजन करण्यात आलेले आहे.

हरी भक्त ह.भ.प. प्रकाश महाराज चंदनखेडे यांचे भागवत कथा प्रवचन होईल सोबत काकड आरती व हरिपाठ संच ह.भ.प वैभव महाराज साटोणे, ह भ प दीपक महाराज सोनवणे, ह भ प वाल्मिक महाराज गजबे, ह भ प सचिन महाराज रणदिवे हे सोबत राहील नोव्हेंबर ला काला दहीहंडीचे दिंडी सोहळा व महाप्रसाद आयोजन करण्यात आलेले आहे. शनिवार १२ नोव्हेंबर ला दुपारी २ च्या नंतर देवळी शहरातून भव्य शोभा यात्रा काढण्यात येईल असे कार्यक्रमाचे मुख्य आयोजक दिनेश क्षीरसागर यांनी अशी माहिती दिली.तसेच समस्थ गावकऱ्यांनी या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे खटेश्वर महाराज पुण्यतिथी महोत्सव समितीने केली आहे.

# कॅथ युथ विंग नि अनाथाश्रम मध्ये चिमुकल्या मुलांन सोबत दिवाळीनिमितय फराळ मिष्ठान वाटप



**साहसिक वृत्त / ४ नोव्हेंबर**

**वर्धा :** कॅथ युथ विंग नि अनाथाश्रम मध्ये चिमुकल्या मुलांन सोबत दिवाळीनिमितय फराळ मिष्ठान वाटप व त्यांच्यासोबत साजरा केला दिवाळी हा सण खुप अनमोल असतो रोषणाई ने जगमग लख भर प्रसन्नन राहते आम्ही सर्व मित्रपरिवार सांगायन सोबत साजरा करतो पण आपन सीएआयटी युथ विंग नि दिवाळीच्या पर्वावर शारदा मुखबधीर विधालंय अनाथआश्रम मध्ये चिमुकल्या मुलांना भेट वस्तु व अलपोआहार देऊन व मुलांसोबत काही क्षणाचा आनंद घेतला.

व तसेच सीएआयटी समुह ने छोटे मुलांसोबत एक झाड एक वृक्ष पर्यावरण चा विषयी बाळगता दिवाळी निमित्ताय या चिमुकल्या मुलांच्या हातुन वृक्षारोपणाचा कार्यक्रम एक झाड नेहमी लावायचं व संगोपन करायच असा संदेश /सुविचार सांगितलं व मुलांना अविस्मरणीय क्षणचा आनंद घेतला व सोबत शिका शर्मा मॅम ने आपले मनोगत मुलांसमोर व्यक्त केले.

व तसेच या कार्यक्रम ला उपस्थित सीएआयटी युथ विंग च्या संयोजिका शिखा शर्मा मॅम, आणि सीएआयटी चे संपुर्ण सदस्य शोभा शर्मा.. समतोषी चे रोहित, धीरज, जान्हवी, श्रुती, राणी, सोनी, सारंग नेवरे अभिजित निनावे,सगायनी हा आनंद या शारदा मुखबधीर अनाथ आश्रम चिमुकल्या मुलासोबत व्यक्त केला

# विदर्भ मुख्याध्यापक संघातर्फे नागपूर विभाग शिक्षक मतदार संघाकरिता सतीश जगताप यांची उमेदवारी जाहीर



**साहसिक वृत्त / ४ नोव्हेंबर**

**वर्धा :** शिक्षण क्षेत्रात अनेक वर्षापासून काम करत असलेले विदर्भ मुख्याध्यापक संघाचे सचिव सतीश जगताप यांना विदर्भ व महाराष्ट्र मुख्याध्यापक संघाच्या कार्यकारिणीच्या सभेत नागपूर शिक्षक मतदार संघ निवडणूक २०२३ करिता उमेदवारी जाहीर केली आहे सभेला मारोती खेडेकर राज्यअध्यक्ष , शत्रुघ्न बिरकड अध्यक्ष विदर्भ , अशोक पारधी कार्याध्यक्ष यांच्यासह नागपूर विभागातील जिल्हा पदाधिकारी उपस्थित होते .

शाळा ही समाज विद्यार्थी शिक्षक पालक संस्था यांना जोडणारा दुवा आहे . सद्यस्थितीत शिक्षण क्षेत्राचा पाहिजे तसा विस्तार न करता अवाजावी बाबी शिक्षकांवर लादल्या जात असल्याने शैक्षणिक क्षेत्र कोलमडत आहे ग्रामीण स्तरावर काय चालतं याचा विचार कोणीच करत नाही शिक्षक शाळा कर्मचारी यांच्यावर तणाव आहे मुक्तपणे ते आपले काम करू शकत नाही.

प्रत्येक शिक्षक हा तणाव मुक्त व्हावा हे माझे पहिले प्राधान्य राहील . मी स्वतः मुख्याध्यापक आहे . शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांची अडचणीची मला जाणीव आहे विद्यार्थी व समाज यांचा अभ्यास आहे ऑनलाइन कामानी शिक्षक पिचून गेला आहे. स्वयंअर्थसहाय्यीत शाळा /शिक्षकांचे प्रश्न बिकट झाले आहे . शिक्षकांना योग्य मार्गदर्शन मिळत नाही त्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात शैक्षणिक कार्यालय शिक्षक आमदारचे राहील त्यात २४ तासात शिक्षकांच्या समस्येचे निराकरण होईल यासाठी माझा प्रयत्न राहील शिक्षण क्षेत्रात भ्रष्टाचार मोठा फोफावला आहे आतापर्यंत झालेल्या शिक्षक आमदारांनी भ्रष्टाचार समितीची स्थापना केली नाही . प्रत्येक जिल्ह्याच्या शिक्षणाधिकारी कार्यालयात भ्रष्टाचार समितीचा स्वतंत्र विभागासाठी आपला जोर राहणार असल्याचेही त्यांनी सांगितले .

शिक्षकासाठी शैक्षणिक कार्यात सतीश जगताप यांचे योगदान अत्यंत मोलाचे आहे ज्या शाळेचे पटसंख्या १०० च्या आत आली होती त्या शाळेतील मुख्याध्यापक , उपमुख्याध्यापक , पर्यवेक्षक यांचे पदावनत होणारे पदास संरक्षण देण्यात यश आले . जुनी पेन्शन योजना व विनाअनुदानीत शाळांना १००ℨ अनुदान मिळण्याकरता आंदोलन व विविध संघटनेचे आंदोलनात सक्रिय सहभाग होता. शालेय पोषण आहार योजनेत शिक्षक यंत्रणेला होणाऱ्या क्लिष्ट ते बाबत बापूकुटी सेवाग्राम येथे राज्यस्तरीय आंदोलन करून समस्या दूर करण्यात यश आले . राज्यस्तरीय शिक्षण वारीच्या उत्कृष्ट नियोजना बाबत सहभाग होता? अखिल महाराष्ट्र मुख्याध्यापक संघाचे राज्यस्तरीय शैक्षणिक संमेलन १४ व १५ डिसेंबर २०१९ ला दत्ता मेघे मेडिकल कॉलेज सभागृह येथे घेण्यात आले होते यावेळी ५००० मुख्याध्यापकांची उपस्थिती होती

(उर्वरित पान २ वर)

# वर्धा जिल्ह्यामध्ये रॉयल सिड्सचा पीक पाहणी कार्यक्रम



**साहसिक वृत्त / ४ नोव्हेंबर**

**वर्धा :** रॉयल सिड्स प्रा. ली.च्या वतीने हिंगणी येथे श्री प्रभाकरराव शेंडे यांच्या शेतामध्ये रॉयल रणधीरँउ २ चा पीक पाहणी कार्यक्रम पार पडला. त्यामध्ये परिसरातील शेतकरी, विक्रेते बांधव उपस्थित होते, त्यामध्ये एकरी झाड संख्या जास्त लावून व हे वाण कमी कालावधी मध्ये येणारे वाण असून , लवकर कापूस येणारे वाण आहे,हे शेतकरी बांधवांना सांगण्याचे काम कंपनी चे रिजनल म्यानेजर श्री सचीन भोयर यांनी सांगितले ,व शेतकऱ्यांना आणि विक्रेते बांधवांनी सुद्धा हे वाण पसंत केले. या कार्यक्रमात वितरक कुणालजी पदमवर, वामनराव सोनटक्के,संचितजी देशमुख, किरण वाघमारे, जगडीशजी काळे,नरेंद्रजी बोरकर, व इतर पाहुणे उपस्थित होते.

व कंपनी प्रतिनिधी. प्रशांत खोडके,राजेंद्र लतारे,शुभम वैद्य, भूषण देसले,विलास तळवेकर व गौरव लोंढे हे उपस्थित होते.

दै.साहसिक हे वृत्तपत्र मालक, प्रकाशक,संपादक रवींद्र नरहरिपंत कोटंबकार,मुद्रक-निरज त्रिपाठी यांनी जनसंग्राम ऑफसेट प्रिंटर्स, आर.टी.रोड गोंडप्लॉट वर्धा येथे मुद्रित करून दै.साहसिक कार्यालय, राधे कॉम्प्लेक्स, अकोला अर्बन बँकेच्यावर, सोशालिस्ट चौक, वर्धा येथे प्रकाशित केले.

दूरध्वनी: (07152) 242498, dsahasik@gmail.com RNI NO. MAHMAR / 2007 / 24829 - Postage- WDA / 42 / 08 -10 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.(कुठलाही वाद वर्धा न्यायालयांतर्गत बाध्य राहील.)